दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118
●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२८७ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शुक्रवार, ५ एप्रिल २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

# ठाण्याचे तारणहार स्वतःच्या भागात उमेदवारी का देऊ शकत नाहीत?

## एकनाथ शिंदे भाजपच्या दहशतीखाली संजय राऊत यांची टीका

आधी तुमची उमेदवारी जाहीर करा, कल्याण डोंबिवलीमध्ये आपण विद्यमान खासदार आहात. जी खासदारकी तुम्हाला उद्धव ठाकरे यांच्यामुळे मिळाली आहे, अद्याप तुम्ही स्वतःची उमेदवारी जाहीर करू शकला नाही. जिंकण्याची भाषा करता बच्चम जी...दिल्ली अभी दूर है... आता तुम्ही दिल्लीत पोहोचणार नाही. आमची सामान्य कार्यकर्ता वैशाली दरेकर तिथे अहंकार आणि गद्दारीचा पराभव केल्याशिवाय राहणार नाही, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे.



**■ठाणे, विशाल कारंडे,**

कोणाला उमेदवारी साठी पक्ष सोडायचा असेल तर तो त्यांचा प्रश्न आहे. मुंबईमध्ये शिवसेना आणि महाविकास आघाडी समोर कोणताही बंडखोर, गद्दार टिकणार नाही. मुंबईच्या सर्व सहाच्या सहा जागा महाविकास आघाडी जिंकणार आहे. त्यामुळे उमेदवारीसाठी कोणी दुसऱ्या पक्षात जात असेल तर आम्हाला त्याचं आव्हान अजिबात वाटत नाही.

महायुतीमध्ये अजूनही सर्व जागांवर उमेदवारी जाहीर झालेली नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्राबल्य असलेल्या ठाणे आणि कल्याण लोकसभा मतदार संघाचे चित्र स्पष्ट झाले नाही. त्यावरुन शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांना घेरले आहे. कल्याण -डोंबिवलीमध्ये अहंकार, गद्दारी आणि पैशांची मस्ती चालणार नाही, आम्ही तुमचा पराभव करू, असे आव्हान संजय राऊत यांनी महायुतीला दिले आहे. तसेच ठाणे शहराचे तारणहार उमेदवार देऊ शकले नाही, असा टोला त्यांनी एकनाथ शिंदे यांना लगावला.

ज्यांची उमेदवारी कापण्यात आली, त्यांना प्रश्न विचारा. नाशिक, रामटेक, हिंगोली, यवतमाळ, वाशिम अजून ठाणे ,कल्याण -डोंबिवलीमध्ये उमेदवार देऊ शकले नाही, जे मुख्यमंत्री स्वतःला ठाण्याचे तारणहार म्हणतात ते आपल्या भागाचे उमेदवार अद्याप जाहीर करू शकले नाही. स्वतः मुख्यमंत्री भाजपच्या दहशतीखाली आहेत. म्हणून ते अचानक कुठेतरी अदृश्य होतात, आगे आगे देखो होता है क्या...असे टोला संजय राऊत यांनी महायुतीला लावला.

### ठाण्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदान?

# 'एमसीए'ची एकमेव निविदा दाखल

**■ठाणे, रोहित जैसवाल,**



ठाण्यात लवकरच आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदान विकसित करण्यात येणार असून यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) स्वारस्य निविदा प्रसिद्ध केल्या होत्या. यासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनची (एमसीए) एकमेव स्वारस्य निविदा सादर झाली होती. आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानाचा विकास करण्यासाठी ठाण्यातील ५० एकर जागा एमसीएला देण्याचा प्रस्ताव एमएसआरडीसीने ठाणे जिल्हाधिकाऱ्यांना पाठविला होता. ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी हा प्रस्ताव राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. या प्रस्तावास राज्य सरकारची मान्यता मिळाल्यास ठाण्यातील पहिले आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदान विकसित करण्यात येईल.

एमएसआरडीसीच्या मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गालगतच्या जागा निविदा प्रक्रियेअंतर्गत विविध खासगी संस्था, कंपन्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भिवंडीतील आमणे गावापासून काही अंतरावरील ५० एकर जागा क्रिकेट मैदानासाठी ६० वर्षांच्या भाडेतत्वावर देण्याचा निर्णय एमएसआरडीसीने घेतला आहे. भिवंडीतील वडपे गावापासून ५ किमी अंतरावर ही जागा असून सध्या ही जागा एमएसआरडीसीच्या ताब्यात आहे. क्रिकेट मैदानासाठी राखीव असलेली ही जागा विकसित करण्यासाठी एमएसआरडीसीने डिसेंबर २०२३ मध्ये निविदा प्रसिद्ध केली होती. या निविदेनुसार आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट मैदान विकासित करण्यासाठी इच्छुक संबंधित संस्थेचा अनुभव, त्यांचे किती खेडाळू राष्ट्रीय स्तरावर निवडले गेले आहेत. सदस्य संख्या आदी बाबींची पडताळणी करण्यात येणार होती. त्यानुसार जानेवारीत निविदा सादर करण्याची अंतिम मुदत होती. या मुदतीत एकमेव एमसीएने स्वारस्य दाखवत अर्ज सादर केल्याची माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. एमसीएच्या निविदेची छाननी करून एमएसआरडीसीने ५० एकरचा भूखंड एमसीएला देण्यासंबंधीचा प्रस्ताव ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला होता. आता ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी राज्य सरकारकडे पाठवला आहे. राज्य सरकारची मान्यता मिळाल्यास हा भूखंड एमसीएकडे हस्तांतरित करण्यात येणार असून एमसीए या भूखंडावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट मैदान विकसित करणार आहे. आचारसंहितेनंतरच या प्रस्तावास मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. मात्र हे मैदान विकसित झाल्यास ठाण्याला पहिले आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट मैदान उपलब्ध होणार आहे.

# डोंबिवली रेल्वे स्थानकात 'बाकड्यांच्या' माध्यमातून खासदार श्रीकांत शिंदे यांचा प्रचार



डोंबिवली रेल्वे स्थानकातील लोकप्रतिनिधींच्या नावे असलेल्या बाकड्यांवर नाव असेल आणि ते निवडणूक आचारसंहितेचा भाग म्हणून झाकले गेले नसेल तर ते तातडीने झाकण्याची कार्यवाही करण्याची सूचना केली जाईल.
**- डॉ. स्वप्निल निला- मुख्य जनसंपर्क अधिकारी मध्य रेल्वे.**

**■डोंबिवली, भावना जैन :**

डोंबिवली रेल्वे स्थानकातील पाचही फलाटांवर प्रवाशांना बसण्यासाठी बाकड्यांची (बेंच) मुबलक सुविधा आहे. ही सुविधा असताना गेल्या काही दिवसांपासून डोंबिवली रेल्वे स्थानकातील पाचही फलाटांवर स्टीलचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या सौजन्याने असे नामफलक असलेले १० ते १५ बाकडे डोंबिवली रेल्वे स्थानकात दिसू लागले आहेत. उपलब्ध बाकडे पुरेसे असताना पुन्हा या वाढीव बाकड्यांची रेल्वे स्थानकात गरजच काय असे प्रश्न प्रवाशांकडून उपस्थित केले जात आहेत.

डोंबिवली रेल्वे स्थानकात पाचही फलाटांवर स्टीलचे, कडाप्पा, खांबाच्या आधाराचे बाकडे आहेत. गेल्या काही वर्षापासून पाठोपाठ लोकल धावत असतात. त्यामुळे प्रवासी बाकड्यांवर काही क्षण बसतो. सकाळ, संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत हे बाकडे अनेक वेळा प्रवाशांना अडचणीचे ठरतात. अशा परिस्थितीत गेल्या काही दिवसापूर्वी डोंबिवली रेल्वे स्थानकातील पाचही फलाटांवर प्रत्येकी तीन ते चार अशा पध्दतीने शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे नामफलक असलेले बाकडे डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाटांवर दिसू लागल्याने प्रवाशांच्या भुवया उंचावल्या आहेत. अगोदरच आहे त्या बाकड्यांचा वापर होत नसताना हे नवीन बाकडे फलाटांवर बसवून प्रवाशांच्या येण्याच्या जाण्याच्या मार्गात अडथळे कशाला आणि कोणी निर्माण केले आहेत, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. खासदार शिंदे कल्याण लोकसभा मतदारसंघातील उमेदवार आहेत. निवडणूक प्रचाराचा भाग म्हणून लोकसभा निवडणुकीपूर्वी हे बाकडे रेल्वे स्थानकात आणून ठेवण्यात आले आहेत का, असेही प्रश्न प्रवासी उपस्थित करत आहेत. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर कल्याण, डोंबिवली शहर परिसरातील राजकीय नेत्यांचे फलक, केंद्र, राज्य सरकारच्या लोकाभिमुख जाहिराती पालिका, महसूल प्रशासनाने विविध प्रकारच्या युक्त्या करून झाकून टाकले आहेत. डोंबिवली रेल्वे स्थानकातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची डिजिटल इंडियाची जाहिरात रेल्वे प्रशासनाकडून झाकून टाकण्यात आली आहे. मग रेल्वे स्थानकातील खासदार शिंदे यांचे नाव असलेल्या बाकड्यांवर अद्याप झाकण्याची कारवाई का करण्यात आली नाही. स्थानिक निवडणूक अधिकारी, रेल्वे प्रशासन याबाबत अनभिज्ञ कसे, असे प्रश्न प्रवासी करत आहेत.

खासदार निधीतून शहरातील विविध प्रभागांमध्ये नागरिकांच्या सोयीसाठी नगरसेवक, लोकांच्या मागणीप्रमाणे बाकडे आणि इतर सुविधा दिल्या जातात. पण रेल्वे स्थानकात खासदारांच्या प्रयत्नाने बाकडे देण्याचा प्रकार पाहून प्रवासी आश्चर्य व्यक्त करत आहेत. रेल्वेच्या यापूर्वीच्या उपलब्ध बाकड्यांच्या मध्ये खासदार सौजन्याचे बाकडे घुसवून बसविण्यात आले आहेत. हे बाकडे फलाटावर खिळेलावून घट्ट बसविण्यात आले नाहीत. त्यामुळे अनेक वेळा गर्दीचा लोट आला की हे बाकडे हलतात. काही वेळा ते सरकतात, अशा तक्रारी प्रवाशांनी केल्या आहेत. अंध व्यक्तिंना हे बाकडे अडथळे ठरत आहेत.

# भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषध तपासणी ठप्प

## एफडीए मधील ८० टक्के अधिकारी, कर्मचारी निवडणूक कर्तव्यावर

FDA MAHARASHTRA
FOOD AND DRUG ADMINISTRATION


देशाच्या उज्वल भविष्यासाठी लोकसभा निवडणूक महत्त्वाची आहे. पण निवडणुकीच्या कामासाठी अत्यावश्यक सेवेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कमी संख्येने नियुक्ती करावी. जेणेकरून कामकाज योग्य पद्धतीने करता येईल.
**- अभय पांडे, अध्यक्ष, ऑल फूड ॲण्ड ड्रग लायसन्स होल्डर फाऊंडेशन**

**■मुंबई, यश सावंत,**

राज्यातील नागरिकांना निर्भेळ अन्नपदार्थ आणि दजेर्दार औषधे मिळावीत यासाठी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) नेहमीच प्रयत्नशील असते. मात्र जाहीर झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी एफडीएमधील सुमारे ८० टक्के अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे पुढील काही दिवस अन्नपदार्थ व औषधांच्या गुणवत्ता तपासण्याचे काम ठप्प होणार आहे. याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. परराज्यातून राज्यात येणाऱ्या औषधांची तपासणी करणे, औषधाच्या दुकानांमधील विविध कंपन्यांच्या औषधांच्या नमून्यांची तपासणी करणे, राज्यातील औषधांची उपलब्धतेवर नियंत्रण ठेवणे आदी कामे औषध निरीक्षक करतात. तसेच परराज्यातून छुप्या पद्धतीने विक्रीसाठी येणारी सुंगधित सुपारी व तंबाखूजन्य पदार्थांवर करडी नजर ठेऊन त्यावर कारवाई करणे, अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी विविध हॉटेल, रेस्टॉरंटवर कारवाई करून नागरिकांना गुणवत्तापूर्ण अन्नपदार्थ उपलब्ध करून देण्यासाठी अन्न निरीक्षक प्रयत्न शील असतात. त्यामुळे मुंबईसह राज्यातील नागरिकांना उत्तम दर्जाचे खाद्यपदार्थ आणि योग्य प्रमाणात औषधे उपलब्ध होण्यास मदत होते.

एफडीएच्या राज्यातील औषध विभागामध्ये जवळपास १५० ते २०० कर्मचारी व अधिकारी, तर अन्न विभागामध्ये सुमारे १२५ ते १५० अधिकारी, कर्मचारी आहेत. त्यापैकी सुमारे ८० टक्के अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. एफडीएमध्ये अपुरे मनुष्यबळ असल्याने कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. त्यातच बहुतांश अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती निवडणुकीच्या कामासाठी केल्यामुळे त्याचा परिणाम भेसळयुक्त अन्नपदार्थ व बनावट औषधांवरील कारवाईवर होण्याची चिन्हे आहेत. औषधांचे नमूने घेण्याच्या प्रमाणात लक्षणीय घट होऊन औषधांची गुणवत्ता तपासणीची प्रक्रिया मंदावण्याची शक्यता आहे. तसेच खाद्यउत्पादक व औषध वितरकांच्या परवान्याचे नूतनणीकरण व नवीन परवाना देण्याची कामेही रखडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. राज्यातील विविध विभागातील बहुतांश अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे उपलब्ध कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या माध्यमातून आम्हाला कामे करावी लागणार आहेत, असे एफडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

# उष्णतेमुळे आरोग्याची काळजी घेण्याचे नवी मुंबई महापालिकेचे आवाहन



### उष्मा जाणवल्यास प्रथमोपचार

साधारणपणे उष्णतेमुळे त्रास झाल्यास त्या अनुषंगाने प्रथमोपचार करावेत. साधा साबण वापरून आंघोळ करावी, घामास अडथळा करणारा कातडीवरील तेलकटपणा दूर करावा, कातडीवर फोड असतील तर वैद्याकिय सल्ला घ्यावा. उष्णतेमुळे प्रचंड थकवा , खूप घाम, थकवा, कातडी थंडगार, नाडीचे ठोके मंद, डोकेदुखी, चक्कर, उलटी ही लक्षणे आढळत असून या रूग्णाला थंड जागी शक्यतो एसी मध्ये झोपवावे, अंगावरील कपडे सैल करावेत, ओल्या व थंड फडक्याने अंग पुसून घ्यावे, थोडे थोडे पाणी पाजत रहावे तसेच उलटी होत असेल तर पाणी देऊ नये व दवाखान्यात हलवावे. उष्णतेपासून बचाव करण्यासाठी पुरेसे पाणी प्यावे. प्रवासात पाणी सोबत ठेवावे. हलक्या वजनाचे, फिकट रंगाचे, सैलसर कपडे वापरावेत.

**■नवी मुंबई, सचिन कदम :**

संपूर्ण राज्यभरात उन्हाचा चटका सातत्याने वाढत असून नवी मुंबईतही दिवसेंदिवस वाढत्या तापमानामुळे नागरीक हैराण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सद्यास्थितीत मार्च महिन्यापासून राज्यातील अनेक भागांत तापमान वाढताना दिसत आहे. ही उष्णतेची लाट किंवा हीट वेव्ह म्हणजे एक मूक आपत्ती आहे. सर्वसाधारणपणे एखाद्या प्रदेशात नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरणातील तापमान ३ अंश सेल्सिअसने सलग तीन दिवस जास्त असेल तर त्याला ह्यउष्णतेची लाटह्न असे संबोधले जाते. अथवा एखाद्या भागात सलग दोन दिवसांसाठी ४५ अंश सेल्शिअसपेक्षा तापमान जास्त असेल तर त्या भागात उष्णतेची लाट आली आहे, असे म्हटले जाते. नवी मुंबईत मागील काही दिवसापासून हवेतील आर्द्रता ५५ अंश सेल्सिअस पर्यंत पोहचली आहे. साधारणपणे मार्च ते जून या मान्सून पूर्वकाळात या उष्णतेच्या लाटा येताना दिसतात. वातावरणाचे तापमान ३७ डिग्री सेल्सियस असते तोपर्यंत मानवाला त्याचा तितकासा त्रास होत नाही. मात्र त्यानंतर मात्र मानवी शरीर वातावरणातील उष्मा शोषून घेऊ लागते आणि त्याचे विपरित परिणाम मानवाच्या शरीरावर होऊ लागतात. तापमान आणि आर्द्रता यांचा मिळून होणारा परिणाम अधिक जास्त असतो. त्यामुळे अति जोखमीच्या लोकांची उष्णतेच्या लाटे संदर्भात विशेष काळजी घेतली पाहिजे. यामध्ये - उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक, वृध्द नागरिक आणि लहान मुले, स्थूल नागरिक, अयोग्य कपडे घालेले लोक, पुरेशी झोप न झालेले लोक, गरोदर महिला, अनियंत्रित मधुमेह, हृदयरोग असलेले लोक, अपस्मार रुग्ण, दारुचे व्यसन असलेले लोक, काही विशिष्ट औषधे घेत असलेले लोक तसेच निराश्रित, घरदार नसलेले गरीब लोक यांनी विशेष काळजी घेतली पाहिजे. उष्णतेमुळे होणारा शारीरिक त्रास हा मुख्यत्वे किरकोळ स्वरुपाचा त्रास किंवा गंभीर स्वरुपाचा त्रास या प्रकारचा असतो. किरकोळ त्रासात उष्णतेमुळे शरीरावर रॅश उमटणे, हाता-पायाला गोळे येणे, चक्कर येणे तर गंभीर प्रकारात उष्माघाताचा समावेश होतो.

# एसटीच्या डिजिटल पेमेंटची मात्राः सुट्ट्या पैशांच्या वादावर एकूण रोजच्या सहा हजार प्रवाशांकडून यूपीआयद्वारे तिकीट खरेदी



**उत्पन्नात वाढ**

महिना - ऑनलाइन तिकिटे खरेदी - एकूण रक्कम
डिसेंबर २०२३ - ६६,०७८ - १.१८ कोटी रुपये
जानेवारी २०२४ - १,०९,४९५ - ३.१२ कोटी रुपये
फेब्रुवारी २०२४ - १,३३,१५४ - ४.१० कोटी रुपये
मार्च २०२४ - २,०५,९६१ - ५.८६ कोटी रुपये

**■मुंबई, विशाल पाटील,**

एसटी महामंडळाच्या बसमध्ये तिकीट काढताना प्रवाशांचा अनेक वेळा वाहकसोबत वाद होतो. सुट्टया पैशांवरून वाद होवू नयेत, यासाठी एसटी महामंडळाने डिसेंबर २०२३ मध्ये डिजिटल पेमेंटला सुरुवात केली. या सुविधेला प्रवाशांचा प्रतिसाद मिळत असून दिवसाला ५ ते ६ हजार प्रवासी यूपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढत आहेत. यामुळे दरमहा ४ ते ५ कोटी रुपये महसूल नव्या डिजिटल यूपीआय पेमेंटद्वारे थेट एसटीच्या बँक खात्यात जमा होत आहे. तसेच वाहकाचे सुट्टे पैसे सांभाळण्याचे कामही हलके होत आहे. सर्वत्र डिजिटल पेमेंटचा पर्याय उपलब्ध आहे. त्यामुळे बहुसंख्य प्रवासी रोख व्यवहार करण्याऐवजी ऑनलाइन व्यवहार करणे पसंत करतात. एसटी महामंडळानेही डिजिटल व्यवहाराचा पर्याय प्रवाशांना उपलब्ध केला आहे. प्रवाशांना बसमध्ये तिकिट काढण्यासाठी फोन पे, गूगल पे यांसारखी सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. वाहकाकडील अँड्राईड तिकीट यंत्रावरील क्युआर कोडद्वारे प्रवाशांना तिकीटाचे पैसे डिजिटल स्वरूपात देणे शक्य होत आहे. या सुविधेमुळे प्रवाशांचा सुट्या पैशांवरून वाहकासोबत होणारा वाद संपुष्टात येऊ लागला आहे, असे एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

एसटीतून दररोज ५० ते ५५ लाख प्रवासी प्रवास करतात. या तुलनेत यूपीआय पेमेंटद्वारे तिकीट काढणाऱ्या प्रवाशांची संख्या कमी आहे. सध्या एसटी महामंडळातील सुमारे ३४ हजार वाहकांकडे ॲंड्रॉईड इलेक्ट्रिक तिकीट यंत्र आहे. बहुतेक वाहकांना हे मशीन जलदगतीने व्यवस्थित हाताळता येत नाही. त्यामुळे वाहक प्रवाशांकडे रोख रकमेने तिकीट काढण्याचा आग्रह धरतात. तसेच यूपीआय पेमेंटबाबत प्रवाशांमध्ये प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे. तसेच वाहकांना ॲंड्रॉईड इलेक्ट्रिक तिकीट यंत्र चालवण्याबाबत प्रशिक्षित करणे गरजेचे आहे, अशी मागणी प्रवाशांकडून केली आहे.

# पनवेल-कर्जत रेल्वे मार्गाची निर्मिती डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचा उद्दिष्ट

**■मुंबई, दिगंबर जाधव :**



विविध शैक्षणिक व दळणवळणाच्या सुविधा, बाजारपेठ, शासकीय कार्यालये, पर्यटनस्थळे आदींसाठी कर्जत प्रसिद्ध आहे. मुंबई-पुण्याला जोडणारे कर्जत हे महत्त्वाचे ठिकाण आहे. त्यामुळे मुंबईहून कर्जतला जाण्यासाठी आणखी एक रेल्वे मार्ग तयार होत आहे. सध्या मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील सीएसएमटीवरून लोकलने थेट कर्जतला जाता येते. तर, येत्या काही वर्षात हार्बर मार्गावरील सीएसएमटीवरून पनवेलमार्गे कर्जत गाठणे शक्य होणार आहे. पनवेल - कर्जत या नव्या उपनगरीय दुहेरी मार्गामुळे मुंबईहून कर्जतला जाण्यासाठी लोकलचा आणखी एक मार्ग उपलब्ध होईल. सध्या या प्रकल्पाचे काम वेगात सुरू असून डिसेंबर २०२५ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. मुंबई महानगराचे विस्तारीकरण होत असून महानगरातील प्रत्येक ठिकाण जलदगतीने जोडण्यासाठी रेल्वे मार्ग तयार केले जात आहेत. मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३ (एमयूटीपी ३) अंतर्गत पनवेल - कर्जत दुहेरी रेल्वे मार्गिका उभारण्याचे काम हाती घेतले आहे. या प्रकल्पाच्या कामातील सर्वात आव्हानात्मक काम म्हणजे बोगदा तयार करणे. या रेल्वे मार्गावर नढाल, किरवली आणि वावर्ले असे तीन ३,१४४ मीटर लांबीचे बोगदे तयार केले जात आहेत. यापैकी बोगदा क्रमांक २ वावर्ले हा २,६२५ मीटर लांबीचा आहे. हा बोगदा पूर्ण झाल्यास मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील सर्वाधिक लांबीचा बोगदा ठरणार आहे. तसेच या मार्गातील बोगदा क्रमांक १ नढालची लांबी २१९ मीटर आणि बोगदा क्रमांक ३ किरवलीची लांबी ३०० मीटर आहे. ऑक्टोबर २०२२ रोजी नढाल बोगद्याचे खोदकाम सुरू झाले होते. हे काम मे २०२३ पर्यंत पूर्ण झाले. आता सध्या जलरोधकीकरण आणि सिमेंट-काँक्रिटीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. तर, २९ सप्टेंबर २०२३ रोजी किरवली बोगद्याचे खोदकाम सुरू झाले असून हे काम ३० मार्च २०२४ रोजी पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच २ एप्रिल २०२४ पर्यंत २,६२५ मीटर लांबीच्या वावर्ले बोगद्याचे २,४२५ मीटरपर्यंत खोदकाम पूर्ण झाले आहे. येत्या महिन्यात हे खोदकाम पूर्ण होईल. पनवेल - कर्जत रेल्वे मार्ग प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांसाठी नवा उपनगरीय मार्ग उपलब्ध होईल, असा विश्वास मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) सुनील उदासी यांनी व्यक्त केला. मध्य रेल्वेवरील सीएसएमटी ते कर्जत धीम्या लोकलने जाण्यासाठी कमीत कमी सव्वादोन तास लागतात. तर, जलद मार्गाने कमीत कमी दोन तास लागतात. मात्र मेल-एक्स्प्रेस, मालगाड्या आणि अपुऱ्या रेल्वे मार्गामुळे कर्जत गाठण्यास नियोजित वेळेपेक्षा जास्त विलंब होतो. सध्या हार्बर मार्गावरून सीएसएमटी-पनवेल लोकलने जाण्यासाठी एक तास २० मिनिटे लागतात. जर पनवेल - कर्जत रेल्वे मार्ग सुरू झाल्यास हार्बर मार्गावरून सीएसएमटी - पनवेल - कर्जत लोकल प्रवास साधारणपणे २.२० तासांत पूर्ण होईल. तसेच भविष्यात हार्बर मार्गावरून सीएसएमटी-पनवेल जलद लोकल धावल्यास, प्रवासाचा कालावधी आणखी कमी होईल.

# उच्च न्यायालयाचे प्रतिबंधित परिसरातील बेकायदा इमारतींचे सर्वेक्षण करण्याचे आदेश

**■पुणे, अभिजीत येरुल्लू,**



खडकी येथील दारूगोळा कारखान्याच्या प्रतिबंधित परिसरात उभ्या राहिलेल्या बेकायदा बांधकामांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने बुधवारी संरक्षण मंत्रालयासह पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेला दिले. हा मुद्दा केवळ बेकायदा बांधकामांपुरता मर्यादित नाही, तर संरक्षण मंत्रालयाच्या जागेवर अतिक्रमण करण्याशीही संबंधित असल्याचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने उपरोक्त आदेश देताना स्पष्ट केले.

तसेच, हे सर्वेक्षण लवकरात लवकर पूर्ण करण्याचेही न्यायालयाने म्हटले. त्याचवेळी, हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने सर्वेक्षणाचा अहवाल सादर करण्यात आल्यानंतर आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर बेकायदा बांधसंरक्षण विभागाच्या मालकीच्या जमिनींवर अतिक्रमण होऊन बेकायदा बांधकामे उभी राहिली आहेत. त्यामुळे, या प्रकरणी कारवाईबाबत संरक्षण विभागाने अधिक सक्रिय असण्याची गरज असल्याची टिप्पणी केली. कामांवरील कारवाईबाबतचे योग्य ते आदेश देण्यात येतील, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. तत्पूर्वी, या प्रकरणी संरक्षण मंत्रालयातील संबंधित अधिकाऱ्याकडून समाधानकारक उत्तरे दिली जात नसल्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

पुणेस्थित दोन रहिवाशांनी दारूगोळा कारखान्याच्या प्रतिबंधित क्षेत्रात उभ्या राहिलेल्या निवासी इमारतींचा मुद्दा उपस्थित करणारी जनहित याचिका केली आहे. या परिसरात कोणत्याही बांधकामाला परवानगी न देण्याचे आदेश प्रतिवादींना द्यावेत, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. त्यावरील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने दारूगोळा परिसरातील प्रतिबंधित क्षेत्रात उभ्या राहिलेल्या बेकायदा बांधकामांच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले. दरम्यान, या याचिकांची दखल घेऊन या परिसरात इमारती बांधण्यास परवानगी दिल्याबद्दल न्यायालयाने यापूर्वीच्या सुनावणीच्या वेळी राज्य सरकारला फटकारले होते.

या इमारती म्हणजे अनियमित शहरी नियोजनाचा भाग असून अशाप्रकारे प्रतिबंधित परिसरात इमारती बांधून मानवी जीवन धोक्यात घालणे चुकीचे असल्याची टिप्पणीही न्यायालयाने केली होती. त्याचवेळी, संरक्षण मंत्रालय, राज्य सरकार, पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांचे आयुक्त आणि पुणे जिल्हाधिकारी यांनी बैठक घेऊन या समस्येवर व्यवहार्य तोडगा काढण्याचे आदेश दिले. तसेच, या प्रकरणी आवश्यक तो तोडगा काढण्यात प्रतिवादी अपयशी ठरल्यास कठोर कारवाईचे आदेश

## कॉर्न फ्रिटर



▮**साहित्य :** मक्याचे दाणे उकडून चेचून, उकडून किसलेला बटाटा, आवडत असल्यास किसलेले चीझ (चेडस चीझ असल्यास उत्तम), मिरपूड, ओरिगनो, बेसिल चुरडून, नसल्यास ड्राय हर्ब्स, किंचित साखर, मीठ, रेड चिली फ्लेक्स. यामध्ये आवडत असेल तर पालक किंवा गाजरही बारीक चिरून अथवा किसून घालता येईल.

▮**कृती :** एका भांड्यात सर्व साहित्य एकत्र करावे. त्याचे चपटे गोळे करावे आणि तव्यावर छान तेलात परतून घ्यावेत. फुटत असतील तर थोडा मैदा, कॉर्नफ्लोअर, ब्रेड कुस्करून घालावा. यामुळे ते मिश्रण मिळून येईल. झाले आपले कॉर्न फ्रिटर तयार.

**प्रसंगानुरूप मनुष्य वेगवेगळ्या प्रकारचे आणि आवश्यकतेनुसार तऱ्हेतऱ्हेचे वस्त्रप्रकार उपयोगात आणत असतो. त्यातलाच एक प्रकार आहे नाइटविअर. हा एक असा प्रकार आहे, जो आपले स्थान केवळ टिकवूनच नाही, तर दिवसेंदिवस अधिकाधिक 'स्टायलिश' होत आहे. ज्या नाइटविअरला आपण अधिक करून गाऊन या एकाच नावाने ओळखत, संबोधत असू तो आज कमालीच्या विविध अवतारांमध्ये दिसतो.**

# तऱ्हेतऱ्हेचे नाइटविअर



**कोणे** एकेकाळी ज्याची सुरुवात झाली असावी, केवळ सोय व आवश्यकता म्हणून. दिवसभराच्या हर तऱ्हेच्या कपड्यांचे ओझे वागवून जीव व देह दोन्हींना जरा आराम मिळावा, यासाठी सुटसुटीत असा हा झोपतानाचा पोशाख म्हणजेच नाइटविअर. हे खरे वाटत नाही ना? तेव्हा या अपेक्षांची पूर्ती करायला रोज वापरून मऊसूत झालेला, अक्षरशः अंगवळणी पडलेल्या एखाद दुसऱ्या रोजच्या ड्रेसने तेव्हा सुरुवात झाली असावी. हळूहळू याच्याकडेही लक्ष दिले जाऊ लागले असावे. त्यामुळेच याला एक विशिष्ट रूप आले. मग त्याची अनेक रूपे झाली. आज ही रूपे शमीस, नाइट ड्रेस कप्तान, गाऊन, मॅक्सी, रॅप सेट, टॉप-शॉर्ट्स सेट, बेबी डॉल अशी आहेत.



▮ शमीस हा साधारणतः सिंगल पीस असतो व लांबीला गुडघ्यांच्या थोडासा वर असतो. यातही आता टू-पीस किंवा रॅप असा आणखी एक प्रकार आला आहे. ▮ सेट म्हणजेच टी शर्ट-स्लीव्हलेस व पँट थ्री-फोर्थ असा ट्रेंड आहे. टीनएजर्ससाठी टॉप-शॉर्ट सेट विशेष करून आवडीचा होताना दिसतोय. ▮ रंग संगतीबद्दल ही आजकाल प्रत्येक जण 'चुझी' होताना दिसत आहे. नाइटविअरही त्याला अपवाद नाही. पांढरा, क्रीम, लायलॅक, पिंक, रेड, ब्लॅक हे झाले क्लासिक्स, तर नवीन रंगांमध्ये प्लम, परपल, हॉट पिंक, अ‍ॅक्वा म्हणजेच हॉट ब्ल्यू. पांढरा, गुलाबी, यलो, ब्राऊन, टरक्वॉइज या रंगांना पसंती आहे. ▮ इतकेच नव्हे तर त्याची डिझाइन, वापरलेले मटेरिअल या गोष्टींकडे ही विशेषत्वाने लक्ष दिले जाते. ब्रायडल आणि डिझायनर नाइटविअरला सुद्धा खूप मागणी आहे यातही पॅटर्नबद्दल बोलायचे झाले, तर पायघोळ, हॉल्टर नेक, योक पिस, शेपली म्हणजेच जास्त घेर नसलेला, फुल, थ्री-फोर्थ हे आहेतच.



▮ शिवाय प्रिंटबद्दल काय विचारायचे. प्लेन, टेक्सचर्ड, एम्ब्रॉयडरी, लाइट आणि ब्राइट प्रिंटेड, अ‍ॅबस्ट्रॅक्ट प्रिंटेड हे आहेचत, पण क्लासिक म्हणावे असे हलकेफुलके फ्लोरल व पोल्का डॉट्स आपले वर्चस्व टिकवून आहे. ▮ नाइटविअर म्हणजे दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य घटक बनलेला आहे.

**केस गळत आहे, टक्कल पडतंय आणि अनेक उपाय करूनही फायदा मिळत नाहीय, तर हे तेल आपल्यासाठी उत्तम पर्याय आहे. याने टक्कल पडलेल्या जागेवरही नवे केस येतील आणि केस दाट होतील. पाहू कसं तयार करायचं हे तेल..**

# या तेलाने उगवतात नवे केस

**हे** तेल तयार करण्यासाठी आपल्याला ५ वस्तूंची गरज आहे ज्या सहजपणे उपलब्ध असतात.



▮ लसणाच्या पाकळ्या : ६ ते ७ ▮ ताजा चिरलेला आवळा : २ ते t ▮ चिरलेला कांदा : १ लहान ▮ एरंडेल तेल : ३ चमचे ▮ नारळाचे तेल : ४ चमचे

या पाचही वस्तू मिसळून आपण तेल तयार करू शकता.

**कृती -** सर्वात आधी एका वाटीत नारळाचे तेल आणि एरंडेल तेल मिसळून घ्या. आता यात कापलेला लसूण, कांदा आणि आवळा टाका. हे मिश्रण मंद आचेवर ५ मिनिटे शिजवून घ्या. आता आचेवरून काढून १ तास हे मिश्रण असंच राहू घ्या. हे तेल नियमितपणे केसांना लावल्याने, केसांचे गळणे कमी होईल आणि गळलेल्या केसांमुळे डोक्यावरील त्वचा दिसायला लागली असेल तर तिथेही नवे केस येतील. याव्यतिरिक्त केसांमध्ये दाटपणा येईल. तर वेळ करू नका, तयार करा आणि या केसांना नवीन जीवन.



# लठ्ठपणा वाढण्याची सहा कारणे, हे उपाय करा!

**महिला असो किंवा पुरुष आपल्या लठ्ठपणामुळं हैराण असतात. या लठ्ठपणामागे अनेक कारणं असतात. आपलं खाणं-पिणं, राहणं यांचा सतत परिणाम आपल्या लठ्ठपणावर होतो. त्यामुळं आपल्या सौंदर्यावर तर परिणाम होतोच शिवाय आरोग्यही धोक्यात येतं.**



**दररोज काबोर्नेटेड ड्रिंक्स पिणं**

जर आपण दररोज सोडा पित असाल तर सावधान, कारण त्याच्या सेवनानं लठ्ठपणा वाढू शकतो. संशोधनकर्त्यांनुसार दररोज सोडा प्यायल्यानं लठ्ठपणा जोमानं वाढतो. तर आठवड्यात एक वेळा सोडा प्यायल्यानं प्रकृतीवर जास्त परिणाम होत नाही. खूप जणांना वाटतं की डायट सोड्यात कमी कॅलरीज असतात. मात्र या कॅलरीजसुद्धा प्रकृतीसाठी हानीकारक असतात. त्यात साखरेचं प्रमाण अधिक असतं म्हणून जेवताना सोडा पिणं टाळावं. जर तुम्हाला जेवताना काही ड्रिंग प्यायचंच असेल तर फळांचा ज्यूस प्या.

**जास्त फॅट्सयुक्त पदार्थ खाल्ल्यानं...**

लठ्ठपणासाठी सर्वात जास्त जबाबदार खाण्या-पिण्याच्या सवयी असतात. जर तुम्ही बेसुमार मिष्ठान्न, तुप, फास्टफूड खात असेल तर लठ्ठपणाला सामोरं जावं लागेल. आपल्या आहारात जास्त फॅट्सयुक्त पदार्थ नसावे, याची काळजी तुम्हालाच घ्यायचीय. कारण त्यात कॅलरीची संख्या खूप कमी असते. त्यामुळं ते टाळल्यानं शरीर स्वस्थ आणि लठ्ठपणा विहरहित राहील. जेवणार ऑलिव्ह ऑर्लचा वापर करावा.

**रात्री उशिरा जेवण करणं आणि लगेच झोपणं...**

हे खरंय की जेव्हा आपण झोपता, तेव्हा नॅचरली आपल्या शरीरातून चरबी कमी होते. मात्र पोटभर जेवून झोपल्यानं असं घडू शकत नाही. अनेक जण रात्री खूप उशिरानं जेवतात, ज्यामुळं त्यांना पोटाशी संबंधित अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं. सोबतच लठ्ठपणा ही समस्याही निर्माण होते. जर तुम्ही योग्य वेळी जेवणाची सवय लावाल, तर लठ्ठपणा कमी करण्यात मदत होईल. सोबतच रात्री जेवण कमी करावं आणि फळं खावीत. याशिवाय जेवल्यानंतर लगेच झोपू नये. कारण असं केल्यानं जेवण पचत नाही. आपल्या जेवणाऱ्या आणि झोपण्याच्या मध्ये कमीत कमी तीन तासांचं अंतर असावं.


**जेवणासाठी मोठं ताट वापरणं...**

जेव्हा आपण घरी किंवा बाहेर जेवता तेव्हा जेवताना आपल्या ताटाच्या आकाराकडे विशेष लक्ष द्यावं. एका सर्व्हेनुसार जे लोक जेवणासाठी मोठं ताट घेतात, त्यात भरपूर पदार्थ वाढून घेतात. त्यामुळं आपल्या शरीराच्या गरजेपेक्षा जास्त जेवण जेवल्या जातं. जर तुम्हाला लठ्ठपणा कमी करायचा असेल तर नेहमी छोट्या प्लेटमध्येच जेवा. यामुळे तुम्ही तुमची ओव्हर इटिंगची सवय बंद करू शकाल.

**क्रोध आणि तणावात असताना अधिक जेवणं करणं...**

आपण नेहमी बघितलं असेल की जेव्हा आपल्या खूप क्रोध येतो किंवा आपण तणावात असाल तर तुम्ही जास्त जेवू लागता. त्यावेळी जेवण चांगलं तर लागत नाही मात्र मनाला शांत करण्यासाठी आणि आणखी काही विचार करण्यासाठी तुम्ही खूप जेवता. त्यामुळं हळूहळू चरबी जमा होत जाते. क्रोध आणि तणाव असताना जास्त जेवण करणं टाळायचं असेल तर पाणी प्या. मित्रांसोबत गप्पा मारा आणि आराम करा. त्याशिवाय इतर कोणत्याही ॲक्टिव्हिटी आपण करू शकता. ज्यामुळं तुम्ही भावूक असताना एक्स्ट्रा कॅलरीज घेण्यापासून वाचू शकता.

# व्हॉट्सॲपचे हे फीचर माहितेय का?



**आजकाल** सगळेच नातेवाईकांशी किंवा मित्रांशी मेसेजवर बोलण्यासाठी व्हॉट्सॲपचा वापरतात. जर तुम्हीही व्हॉट्सॲप युजर असाल तर ही माहिती तुमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. मेटा-मालकीचे इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप आपल्या युजर्सना बिल्ट-इन ट्रान्सलेशन फीचर ऑफर करत आहे. या फीचरच्या मदतीने तुम्ही तुमचा मेसेज समोरच्या व्यक्तीपर्यंत कोणत्याही भाषेत पोहोचवू शकता. म्हणजेच जर तुम्हाला हिंदी भाषा येत असेल. परंतु तुम्हाला इंग्रजी किंवा इतर कोणतीही भाषा जाणणाऱ्या तुमच्या मित्राशी किंवा ऑफिसमधील सहकाऱ्याशी बोलायचे असेल तर तुम्ही ते सहज करू शकता. भाषांतर फीचर वापरण्यासाठी पाहा ही स्टेप बाय स्टेप प्रोसेस. भाषांतर फीचर वापरण्यासाठी तुम्हाला ही प्रोसेस फॉलो करावी लागेल. तुमचे व्हॉट्सॲप चॅट उघडा आणि एक नवीन मेसेज टाइप करा. आता हा टाईप केलेला मेसेज मेनू येतपर्यंत होल्ड करून ठेवा. आता मेनूमधील 'अधिक' पर्याय निवडा. आता भाषांतर पर्याय निवडा. आता तुमच्या समोर एक पॉप-अप विंडो उघडेल ज्यामध्ये तुम्हाला भाषांतरित मेसेज दिसेल. जर तुम्ही पाठवू इच्छित असलेल्या भाषेत मेसेजेसचे भाषांतर केले नसेल, तर युजर्स त्यांना ज्या भाषेत संदेश पाठवायचा आहे ते निवडू शकतात. तसेच व्हॉट्सॲपने एक नवीन फीचर रोल आउट करण्यास सुरुवात केली आहे. या नवीन फीचरच्या मदतीने युजर्स स्टेटस अपडेट्समध्ये व्हॉइस नोट्सही शेअर करू शकतील. व्हॉईस स्टेटस अपडेट फीचरची माहिती WA BetaInfo या प्लॅटफॉर्मद्वारे देण्यात आली आहे, जी व्हॉट्सॲप वर येणाऱ्या नवीन फीचर्सचा ट्रॅक ठेवते. WA BetaInfo ने ट्विट करून व्हॉट्सॲपमधील या नवीन फीचरचा स्क्रीनशॉटही शेअर केला आहे. WA BetaInfo नुसार, कंपनी सध्या काही बीटा युजर्ससाठी हे फीचर आणत आहे.

## साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत पोहोचली सई ताम्हणकर! निवडणुकांबद्दल म्हणाली, "राजकारणात आता नवीन..."



मराठमोळ्या सई ताम्हणकरने गेल्या काही वर्षांत मराठीसह बॉलीवूड चित्रपटांमध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या 'भक्षक' चित्रपटात अभिनेत्रीने भूमी पेडणेकरबरोबर स्क्रीन शेअर केली होती. याशिवाय सई लवकरच फरहान अख्तरच्या 'डब्बा कार्टेल'मध्ये महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. एकंदर २०२४ मध्ये सई बॉलीवूड गाजवण्यासाठी सज्ज झाली आहे. याच पार्श्वभूमीवर अभिनेत्रीने नुकतंच शिर्डीच्या साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं.

यानंतर सईने माध्यमांशी संवाद साधला. ''येत्या काळात माझे खूप प्रोजेक्ट पडद्यावर येणार आहेत. पण, आज माझ्या आगामी प्रोजेक्ट्सपेक्षा जास्त गुरुवारचं महत्त्व आहे. माझ्या कामाबद्दल आपल्यामध्ये नेहमीच चर्चा होते. पण, मंदिरात येऊन खरंच फार छान वाटतं. मंदिरातील स्वच्छता, नियोजन या सगळ्या गोष्टी पाहून मन प्रसन्न होतं. योग्य नियोजनामुळेच प्रचंड गर्दीतही शिर्डीला आलेल्या भाविकांना चांगलं दर्शन मिळतं असा माझा अनुभव आहे.'' असं सई ताम्हणकरने सांगितलं.

सईला राजकीय परिस्थिती व निवडणुकांबद्दल विचारलं असता अभिनेत्री म्हणाली, ''आम्ही एखादा चित्रपट केला, तर तो किती कलेक्शन करेल याबाबत आपल्याला काहीच माहिती नसते. तसंच राजकारणात सुद्धा आहे. हा सगळा वेट अँड वॉचचा गेम आहे. येत्या काळात आपल्यासमोर चित्र स्पष्ट होईलच. राजकारणात आता नवीन पिढी येऊ पाहतेय आणि नवीन विचारसरणी सुद्धा रुजू होऊ पाहत आहेत. गेल्या काही वर्षांत आपण डिजिटली खूप प्रगती केलीये आणि ही चांगली गोष्ट आहे. बाकी इतर गोष्टी येत्या काळात स्पष्ट होतील.''

दरम्यान, सई शेवटची सिद्धार्थ चांदेकरबरोबर 'श्रीदेवी प्रसन्न' या चित्रपटात झळकली होती. आता लवकरच 'भक्षक'नंतर ती 'डब्बा कार्टेल'मधून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी सज्ज होणार आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ४८


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 9 | 2 | 6 | | | 8 |
| 8 | | | | | 7 | | | |
| 2 | | 4 | | 5 | | | 7 | |
| | | | 1 | 9 | | 7 | 4 | 6 |
| | | 5 | | 7 | | | | |
| | 4 | 1 | 3 | | 8 | 9 | 2 | |
| | 1 | 9 | 5 | | 3 | | | |
| | | | | | | | | 4 |
| 6 | 8 | 3 | | | | | 9 | |

### उत्तर सुडोकू -४७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 8 | 6 | 4 | 3 | 7 | 1 | 2 | 5 |
| 1 | 2 | 7 | 6 | 5 | 8 | 3 | 4 | 9 |
| 4 | 5 | 3 | 9 | 1 | 2 | 6 | 7 | 8 |
| 2 | 7 | 5 | 8 | 4 | 6 | 9 | 1 | 3 |
| 3 | 9 | 4 | 1 | 7 | 5 | 8 | 6 | 2 |
| 6 | 1 | 8 | 2 | 9 | 3 | 4 | 5 | 7 |
| 5 | 4 | 2 | 3 | 6 | 9 | 7 | 8 | 1 |
| 7 | 6 | 9 | 5 | 8 | 1 | 2 | 3 | 4 |
| 8 | 3 | 1 | 7 | 2 | 4 | 5 | 9 | 6 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## मोहन जोशींना यंदाचा 'झी जीवन गौरव' पुरस्कार प्रदान! म्हणाले, "आताच्या नव्या पिढीने..."




मराठी नाट्यसृष्टीत प्रतिष्ठित व मानाचा समजला जाणारा 'झी नाट्य गौरव २०२४' हा पुरस्कार सोहळा काही दिवसांपूर्वी अतिशय उत्साहात पार पडला. कलाकारांनी सादर केलेल्या नांदीने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. येत्या रविवारी या सोहळ्याचं प्रक्षेपण करण्यात येणार आहे. प्रिया बापट, प्रशांत दामले, उमेश कामत, महेश मांजरेकर, सिद्धार्थ जाधव, विराजस कुलकर्णी, ओंकार भोजने, भाऊ कदम असे बरेच कलाकार या सोहळ्याला उपस्थित होते. यावर्षी ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांचा जीवन गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

बालनाट्य, एकांकिका, प्रायोगिक नाटक, व्यावसायिक नाटक या सगळ्यातील हुकमी नाव म्हणजे मोहन जोशी. 'थँक्यु मिस्टर ग्लाड', 'तरुण तुर्क म्हातारे अर्क', 'गुड बाय डॉक्टर', 'नाती गोती', 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'श्री तशी सौ', 'कुर्यात सदा टिंगलम', 'ती फुलराणी', 'मी रेवती देशपांडे', 'माझं छान चाललंय', 'कार्टी काळजात घुसली' अशी एकूण पन्नासपेक्षा अधिक नाटके त्यांनी गाजवली आहेत. केवळ नाटकच नव्हेतर मालिका आणि चित्रपटांमध्येही त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला. यामुळे यंदाचा 'झी मराठी' पुरस्कार सोहळ्यातील 'जीवनगौरव पुरस्कार' त्यांना प्रदान करण्यात आला आहे.

मोहन जोशी याबद्दल लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीत सांगतात, ''मला हा पुरस्कार स्वीकारून अतिशय आनंद झाला. त्यात माझी बालमैत्रीण रोहिणी हट्टंगडीच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारता आला याचा विशेष आनंद आहे. नाटक म्हणजे माझ्यासाठी जीव की प्राण आहे. यामध्ये चांगलं काम कसं करता येईल यासाठी प्रत्येक कलावंत प्रयत्न करत असतो. प्रामाणिकपणे काम करून खूप कष्ट करण्याची तयारी ठेवा हा संदेश मी आताच्या नव्या पिढीला देईन.''

दरम्यान, 'झी नाट्य गौरव पुरस्कार २०२४' या पुरस्कार सोहळ्याचं प्रक्षेपण रविवारी ७ एप्रिल रोजी संध्याकाळी ७ वाजता झी मराठी वाहिनीवर करण्यात येणार आहे. या सोहळ्यात विविध गाजलेल्या नाटकातील प्रवेशांक प्रेक्षकांना पाहायला मिळतील.

## दिनविशेष

### ५ एप्रिल

- ◆१६६३: दहा हजार फौजेसह पुण्याच्या लाल महालात तळ देऊन राहिलेला मोगल सुभेदार शाहिस्तेखान याच्यावर शिवाजी महाराजांनी दोनशे स्वारांसह अकस्मात छापा घातला. शाहिस्तेखान खिडकीतुन पळून गेल्याने बचावला; मात्र पळुन जाण्याच्या प्रयत्नात त्याची तीन बोटे तुटली. या प्रसं
- ◆१६७९: राजारामास पकडण्यासाठी झुल्फिकारखानाने रायगडास वेढा दिला असता राजाराम रायगडावरुन प्रतापगडास गेला. पुढे प्रतापगडासही शत्रूने वेढा दिल्यावर राजारामास पन्हाळगडावर जावे लागले.
- ◆१९५७: कम्युनिस्ट पक्षाने भारतात प्रथमच केरळमध्ये निवडणूका जिंकल्या आणि इ. एम. एस. नंबुद्रीपाद हे केरळचे मुख्यमंत्री झाले.
- ◆२०००: अभिनेत्री सुलोचना यांच्या हस्ते डी. डी. झ१० या मराठी उपग्रह वाहिनीचे सह्याद्री असे नामकरण करण्यात आले.
- ◆२०००: जळगाव नगरपालिकेच्या १७ माजली इमारतीचे उद्घाटन.
- ◆१९९९: राष्ट्रीय समुद्री दिवस भारताच्या मालकीचं पहिलं जहाज एस.एस. लॉयल्टी लंडनला रवाना झालं.
- ◆१८२७: निर्जंतुकीकरणामुळे जखमा लवकर बऱ्या होतात हे सिध्द करणारा ब्रिटिश शल्यविशारद सर जोसेफ लिस्टर यांचा जन्म. (मृत्यू: १० फेब्रुवारी १९१२)
- ◆१८५६: अमेरिकन निग्रोंच्या प्रश्नासाठी कार्य करणारे समाजसेवक, लेखक, वक्ते व शिक्षणतज्ञ बुकर टी. वॉशिंग्टन यांचा जन्म. (मृत्यू: १४ नोव्हेंबर १९१५)
- ◆१९०८: स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, राजकारणी, केंद्रीय मंत्री व भारताचे उपपंतप्रधान बाबू जगजीवनराम यांचा जन्म. (मृत्यू: ६ जुलै १९८६)
- ◆१९०९: जेम्स बाँड चित्रपटांचे निर्माते अल्बर्ट आर. ब्रोकोली यांचा जन्म. (मृत्यू: २७ जून १९९६)
- ◆१९१६: हॉलीवूड अभिनेता ग्रेगरी पेक यांचा जन्म. (मृत्यू: १२ जून २००३)
- ◆१९२०: महाराष्ट्राचे नगरविकासमंत्री आणि लोकसभा सदस्य डॉ. रफिक झकारिया यांचा जन्म. (मृत्यू: ९ जुलै २००५)
- ◆१९२०: इंग्लिश कादंबरीकार आर्थर हॅले यांचा जन्म. (मृत्यू: २४ नोव्हेंबर २००४)
- ◆१९६६: भारतीय-अमेरिकन अभिनेते आणि निर्माते आसिफ मांडवी यांचा जन्म.
- ◆१९१७: स्वातंत्र्यशाहीर शंकरराव निकम यांचे निधन.
- ◆१९२२: आर्य महिला समाजच्या संस्थापिका पंडिता रमाबाई यांचे निधन. (जन्म: २३ एप्रिल १८५८)
- ◆१९४०: इंग्लिश मिशनरी, महात्मा गांधींचे जवळचे मित्र, समाजसेवक आणि भारताच्या स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते चार्लस फ्रिअरी तथा दीनबंधू अ‍ॅन्ड्र्यूज यांचे निधन. (जन्म: १२ फेब्रुवारी १८७१)
- ◆१९६४: नकलाकार गोपाळ विनायक भोंडे यांचे निधन.
- ◆१९९३: हिंदी, तामिळ आणि तेलगु चित्रपट अभिनेत्री दिव्या भारती यांचे निधन. (जन्म: २५ फेब्रुवारी १९७४)

## भविष्य

**मेष** तुमचा इतरांवर प्रभाव राहील. व्यवसायात नवीन तंत्र व मंत्र अंमलात आणू शकाल. वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**वृषभ** महत्त्वाची कामे दुपारनंतर मार्गी लागतील. आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील.

**मिथुन** वाहने जपून चालवावीत. अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क** राजकीय क्षेत्रात सहभागी व्हाल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. तुमच्या कार्यक्षेत्रात मानसन्मान, प्रतिष्ठा लाभेल. शासकीय कामे मार्गी लागतील. खर्चाचे प्रमाण वाढेल.

**सिंह** एखादी गुप्त वार्ता समजेल. हितशत्रुंचा त्रास संभवतो. राजकीय व सामाजिक क्षेत्रात सहभागी व्हाल. मानसन्मान व प्रतिष्ठा लाभेल. भागीदारी व्यवसायातील निर्णय मार्गी लागतील.

**कन्या** मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील. खर्चाचे प्रमाण वाढेल. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.

**तुला** प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वादविवाद टाळावेत. इतरांच्या सहकायार्ची अपेक्षा नको. एखादी महत्त्वाची वार्ता समजेल.

**वृश्चिक** जिद्दीने कार्यरत रहाल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल. वरिष्ठांबरोबर मतभेदाची शक्यता. महत्त्वाची कामे रखडण्याची शक्यता. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल.

**धनु** आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. मनोबल उत्तम राहील. वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी. नोकरी, व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील.

**मकर** आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभेल. उत्साह व उमेद वाढविणारी एखादी घटना घडेल. आरोग्य उत्तम राहील. वेळ व पैसा वाया जाण्याची शक्यता.

**कुंभ** काहींना कामाचा ताण व दगदग जाणवेल. मानसिक अस्वस्थता जाणवेल. अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाचे पत्रव्यवहार पार पडतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**मीन** मित्रमैत्रिणींचा सहवास लाभेल. महत्त्वाचे पत्र व्यवहार पार पडतील. वादविवाद टाळावेत. शासकीय क्षेत्रात सुसंधी लाभेल. तुमचे कार्यक्षेत्र वाढणार आहे. मनोरंजनाकडे कल राहील. प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# बडबड बहरातील मौनी!

मितभाषिकास मर्यादा मानणाऱ्या, सज्जनतेस नामर्द समजणाऱ्या, विचारवंतांपेक्षा वावदुकांस डोक्यावर घेणाऱ्या समाजात मनमोहन सिंग दुर्लक्षित राहणे साहजिक... आपल्याला शांतता ऐकता येत नाही, असे कुमार गंधर्व म्हणत. खरे आहे ते. इतके की घरात एखाद्या किरकिऱ्या तान्ह्या बाळापेक्षा शांत, सुस्वभावी बालकाची अधिक काळजी त्याच्या पालकांस वाटते. असे शांततेचा दुस्वास करण्याचे संस्कार रक्तातूनच आपल्या अंगी भिनले जात असल्यामुळे एखाद्या सुशांत, प्रगल्भ, अल्पभाषी/अल्पाक्षरी व्यक्तीपेक्षा सदैव वचावचा करणारी, तोंडाची टकळी सतत सुरू ठेवणारी व्यक्ती ही अधिक दिलखेचक ठरते. जत्रेत ज्याप्रमाणे साबणसदृश द्रावाचे फुगे लहानग्यांस आकृष्ट करतात त्याप्रमाणे समाजात शब्दांचे बुडबुडे हवेत सोडणारी व्यक्ती जनसामान्यांस अधिक आकर्षित करत असते. म्हणून आपली संस्कृती ''बोलणाऱ्याची बोरे खपतात, पण अबोलांचे आंबेही खपत नाहीत'', हे मान्य करते. हे इतपत एक वेळ ठीक. पण आवाज, नादास सतत महत्त्व देण्याच्या बौद्धिक अजागळपणामुळे शांत व्यक्ती मुखदुर्बळ गणली जाऊन बडबड्या असामींच्या तुलनेत अकार्यक्षम ठरवली जाऊ लागते, तेव्हा मात्र ही परिस्थिती काळजी करावी अशी ठरते. हा काळ परीक्षा पाहणारा खरा. मनमोहन सिंग यांनी व्यक्ती म्हणून हा काळ कसा व्यतीत केला असेल? जागतिक स्तरावर गौरविला गेलेला बुद्धिमान, भारताच्या आर्थिक प्रगतीचे रुतलेले गाडे ज्यांच्यामुळे भरधाव धावू लागले असा अर्थशास्त्री जेव्हा राजकारणाच्या रामरगाड्यात 'नामर्द', 'निष्क्रिय' ठरवला जातो तेव्हा ती अधोगती त्या व्यक्तीची नव्हे, तर ती समाजाची असते. ती अधोगती मनमोहन सिंग यांनी साहिली आणि जवळपास तीन दशकांहून अधिक काळाची आपली संसदीय कारकीर्द संपवून ते आज वयाच्या ९१ व्या वर्षी या 'लोकशाहीच्या मंदिर' वगैरेतून निवृत्त झाले. या अतिशय तरल क्षणी त्यांना स्वतःचे एक भाकीत प्रत्यक्षात येताना पाहून समाधान वाटत असेल. ''हिस्टरी विल बी काईंडर टू मी दॅन द मीडिया'' (माध्यमांपेक्षा इतिहास मला अधिक न्याय देईल) हे मनमोहन सिंग यांचे पंतप्रधानपदावरील अखेरच्या पत्रकार परिषदेतील विधान आज त्यांच्यासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरेल. ते माध्यमांच्या मर्यादाही दाखवून देते. आवाज करणाऱ्याकडे आकृष्ट होण्याची माध्यमांचीही सवय. तथापि समोरचा आपल्यापेक्षाही अधिक आवाज करणारा निघाला की माध्यमे एक पाय मागे घेतात. मनमोहन सिंग असे नसल्यामुळे त्यांच्यावर माध्यमांनी राळ उडवली. अण्णा हजारे, बाबा रामदेव यांच्यासारख्या वावदुकांनाही माध्यमांनी त्या वेळी डोक्यावर घेतले आणि डोक्यात बरेच काही असलेल्या मनमोहन सिंग यांस पायदळी तुडवले. आज त्याच माध्यमांची अवस्था पाहून मनमोहन सिंग यांच्या मनात 'जितं मया' या भावनेपेक्षा माध्यमांविषयी सहानुभूतीच दाटून येत असेल. भारतीय समाज त्यास गप्प बसवणाऱ्याच्या मागे मोठ्या उत्साहाने जातो. म्हणजे एखादा स्वातंत्र्य देतो आहे त्याचा आदर करण्याऐवजी स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्यास कर्तबगार मानण्याची वृत्ती भारतीयांत प्राधान्याने दिसते. त्यातूनच 'कल्याणकारी हुकूमशाही' (बेनोव्हलंट डिक्टेटरशिप) हा अत्यंत फसवा शब्दप्रयोग जन्माला येतो. फसवा असे ठामपणे म्हणता येते कारण कोणतीही हुकूमशाही कल्याणकारी नसते. ती कल्याणकारी आहे असा आभास फक्त अधिकार पूर्णांशाने हाती येईपर्यंतचा. नंतर ही हुकूमशाही कोणत्याही अन्य हुकूमशाह्यांप्रमाणेच कराल होते, हा इतिहास. मनमोहन सिंग यांस तो अर्थातच ठाऊक. पण त्याच्या अवलोकनाची गरज त्यांस कधीही लागली नाही. कारण अस्सल पाश्चात्त्य लोकशाहीवादी मूल्यांचे त्यांच्यावर झालेले संस्कार. तथापि या संस्कारांनीच त्यांचा घात केला. माध्यमांप्रमाणेच त्यांच्यावर आणखी कोणी अन्याय केला असेल तर तो म्हणजे त्यांचा स्वतःचा काँग्रेस पक्ष. पंतप्रधानपदाच्या पहिल्या फेरीत डाव्यांचा रोष ओढवून घेत सत्ता पणास लावण्याची हिंमत दाखवणारे मनमोहन सिंग पंतप्रधानपदाच्या दुसऱ्या फेरीत पक्षीय राजकारणामुळे हळूहळू नामोहरम होत गेले. सत्तेचा सर्वाधिकार त्यांच्या हाती कधीच आला नाही आणि केवळ पंतप्रधानपदाच्या अधिकारांस त्यांच्या पक्षाने काही किंमत ठेवली नाही. स्वतःच्या पक्षाचे, स्वतः निवडलेल्या नेत्याहाती सरकार असताना काँग्रेसाध्यक्ष सोनिया गांधी यांचे 'नॅशनल ॲडव्हायजरी कौन्सिल' हे सिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात अधिक प्रभावी सत्ताबाह्य सत्ताकेंद्र ठरले, हा मनमोहन सिंग यांच्यावर त्यांच्या पक्षाने केलेला अन्याय. काँग्रेसचे नेतृत्व त्या काळी 'एनजीओ टेररिझम'चे सक्रिय केंद्र बनले. त्यातून आपल्याच पक्षाचा पंतप्रधान घायाळ होत आहे, याचेही भान त्या पक्षास राहिले नाही. म्हणूनच सरळ सरळ एका उद्योग समूहास धार्जिणी भूमिका घेणारे, अर्थदुष्ट धोरणे आखणारे अर्थमंत्री प्रणब मुखर्जी यांना इच्छा असूनही मनमोहन सिंग अर्थमंत्रीपदावरून दूर करू शकले नाहीत. मुखर्जी यांचा पंतप्रधान सिंग यांच्यावर विशेष राग. याचे कारण सिंग यांची रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी नेमणूक १९८२ साली झाली ती तत्कालीन अर्थमंत्री मुखर्जी यांच्या स्वाक्षरीने. आपण ज्यास रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी नेमले ती व्यक्ती पंतप्रधान होऊन आता आपल्या डोक्यावर बसणार हे सत्य पचनी पडणे प्रणबदांस अवघड गेले. त्यामुळे ते सिंग मंत्रिमंडळात राहून सिंग यांस अप्रिय धोरणे राबवत राहिले आणि काँग्रेस पक्ष ते निष्क्रियपणे पाहत राहिला. एका समर्थ बुद्धिमंतास कसे असमर्थ केले जाते हे दाखवून देणारी ही शोकांतिका. शिवाय त्यावर अवमानाचे मीठ चोळणारे राहुल गांधी! आपल्याच सरकारच्या विधेयकाचा मसुदा जाहीरपणे टराटरा फाडण्याची राहुल गांधी यांची रोड-साइड हिरोगिरीही मनमोहन सिंग यांनी पोटात घेतली. तो त्यांच्या कारकीर्दीतील सर्वात वेदनादायी क्षण ठरावा.

# एसटीच्या मार्गात आचारसंहितेचा अडथळा

**राज्याच्या वार्षिक अर्थसंकल्पात एसटी बसेस खरेदीसाठी ९१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असतानाही, केवळ हा निधी वेळेत न दिल्यामुळे बस खरेदी रखडली आहे. आता आचारसंहिता संपेपर्यंत याबाबत काहीही होणे शक्य नाही. परिणामी कर्मचारी आणि प्रवाशांना गैरसोय सहन करावी लागणार हे निश्चित!**



आचारसंहिता लागू होण्यापूर्वी २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या निधीचा विनियोग व्हावा यासाठी राज्य सरकारने विकासकामांच्या उद्घाटनांचा सपाटा लावला आणि तरीही राज्य सरकारच्या नियोजनशून्य कारभाराचा व लोकसभेच्या निवडणूक आचारसंहितेचा फटका एसटीला बसला आहे. स्थानक नूतनीकरणासह काही कामे अपूर्णच राहिली आहेत. त्यामुळे करोना कालावधी व संपानंतर जोरदार उभारी घेत वेग पकडलेल्या एसटीच्या कारभाराला सरकारच्या नियोजनशून्यतेमुळे 'ब्रेक' लागला आहे.

उदाहरणासह स्पष्ट करायचे झाल्यास राज्याच्या २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात एसटीला दोन हजार २०० नवीन स्वमालकीच्या गाडया घेण्यासाठी ९१२ कोटी रुपयांची तरतूद कागदोपत्री करण्यात आली होती. ती रक्कम काही एसटी महामंडळाकडे आलीच नाही. परिणामी जनतेला हव्या असलेल्या 'लाल परी'ची खरेदी लांबणीवर पडली आहे. आता ही खरेदी किमान सहा ते आठ महिने लांबणीवर जाईल, हे स्पष्टच दिसते. त्यातच १५ वर्षे वापरण्यात आलेल्या आणि आता भंगार झालेल्या गाडया काढून नव्या गाडया घेण्याचा संकल्पही सरकारच्या बेफिकिरीमुळे कागदावरच राहणार आहे. हा संकल्प आता आचारसंहितेच्या विळख्यात अडकला आहे. अगदी कंत्राटी विद्युत गाडयांची मागणीही पूर्ण करण्यासंदर्भात हालचाली होऊ शकत नसल्याने सामान्यांची गैरसोय होणार आहे.

राज्याच्या वार्षिक अर्थसंकल्पात एसटी बसेस खरेदीसाठी ९१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र, ही रक्कम सरकारच्या नियोजनशून्य कारभारामुळे व आचारसंहिता लागू होण्यापूर्वी विनियोग करण्यात न आल्यामुळे एसटी महामंडळाला मिळालीच नाही. किंबहुना आचारसंहितेपूर्वी ही रक्कम एसटीच्या ताब्यात यावी, यासाठी सरकारने कुठलेही प्रयत्न केले नाहीत. मार्चअखेरीस आर्थिक वर्ष संपणार व आचारसंहिता लागू होणार हे माहीत असूनही त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात आले का, असा प्रश्न पडतो. आता ही रक्कम मिळण्याची शक्यता धूसर झाली आहे. किंबहुना मिळणारच नाही, असे दिसते.

एसटी महामंडळाने कंत्राट दिलेल्या विजेवर चालणाऱ्या बसगाडयाही नियोजित वेळेत येणार नसल्याने याचाही फटका सामान्यांना बसणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने १६ मार्चला पत्रकार परिषद घेऊन देशातील सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम व वेळापत्रक जाहीर केले. लोकसभा निवडणुकीची घोषणा झाल्यापासून देशभरात आदर्श आचारसंहिता लागू झाली होती. या काळात सरकारला कोणतेही नवे धोरणात्मक निर्णय घेता येत नाहीत किंवा प्रकल्पांची घोषणा, भूमिपूजन, उद्घाटनादि कार्यक्रम करता येत नाहीत. परिणामी प्रशासकीय निर्णय आणि नवी विकासकामे हाती घेण्याची प्रक्रिया जवळपास ठप्पच होते. साहजिकच एसटी महामंडळालासुद्धा याचा मोठा फटका बसला आहे.

१५ वर्षे होऊन गेलेल्या जवळपास एक हजार गाडया भंगारात काढणे आवश्यक असतानाही नव्या गाडया दाखल होण्यास उशीर होत आहे. यामुळे प्रवाशांच्या गैरसोयींत भर पडणार आहे. दोन हजार २०० डिझेलवरील स्वमालकीच्या गाडया खरेदीचे कंत्राट कंपनीला देण्यात येणार आहे, मात्र त्याचे पैसे देण्यासाठी महामंडळाकडे निधीच नसल्याने वर्कऑर्डर देता आलेली नाही. परिणामी महामंडळाला नवीन गाडया मिळण्यास उशीर होणार आहे. आचारसंहिता ५ जूनला संपत असल्याने त्यानंतरच या गाडयांची वर्कऑर्डर दिली जाऊ शकते. नियमाप्रमाणे वर्कऑर्डर दिल्यानंतर या गाडया मिळण्यास किमान तीन महिन्यांनी सुरुवात होईल व सर्व बस रस्त्यावर येण्यास आणखी सहा ते आठ महिने लागण्याची शक्यता आहे. साहजिकच या काळात एसटीने प्रवास करणाऱ्या नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागणार आहे. सध्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात एकूण १५ हजार गाडया असून त्यातील एक हजार गाडया येत्या सहा महिन्यांत १५ वर्षे पूर्ण झाल्याने भंगारात काढाव्या लागणार आहेत. प्रवाशांचे प्रमाण पाहता प्रत्यक्षात एसटी महामंडळाला एकूण १८ हजार बसगाडयांची गरज आहे. पण ते आता अशक्य होऊन बसले आहे.

**अनियमित वेळापत्रकाचा एसटीला फटका**

साधारण आठ वर्षांनंतर गाडयांमध्ये विविध प्रकारचे दोष निर्माण होण्यास सुरुवात होते. ग्रामीण भागांतील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे महामंडळाची वाहने अकाली निकामी होतात. त्यामुळे बसचा मूळ सांगाडा खिळखिळा होतो. वाहने दुरुस्त करण्यातच महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा वेळ विनाकारण वाया जातो व इतर कामांकडे दुर्लक्ष होते. आठ वर्षांनंतर वाहने वारंवार दुरुस्त करावी लागतात. त्यात बरेच आर्थिक नुकसान होते. तरीही सद्यःस्थितीत अन्य कोणताही पर्याय नसल्यामुळे नाईलाजाने ही वाहने रस्त्यावर आणणे भाग पडत आहे. परिस्थिती भयावह व गंभीर असली तरी महामंडळाचे कर्मचारी आहे त्या परिस्थितीत कोणतीही तक्रार न करता प्रवाशांसाठी वाहने निरंतर उपलब्ध करून देत आहेत. ही महामंडळासाठी जमेची बाजू आहे.

याशिवाय पुरेशा प्रमाणात गाडयाच उपलब्ध होणार नसल्याचे येत्या काही महिन्यांनंतर चालक, वाहकांसाठीचे काम कमी होण्याची आणि त्यातून नवीन समस्या निर्माण होण्याची भीती आहे. शिवाय जुन्या गाडया वापरताना त्यांच्या सुटया भागांसाठी आणि ऑइल इत्यादींसाठी करावा लागणारा खर्च दुपटीने वाढण्याचीही शक्यता वर्तवण्यात येत आहे. एकंदरीत आधीच आर्थिक ओढगस्तीचा सामना करणाऱ्या महामंडळाला नव्या समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. जुन्या गाडया चालवणे हे चालक-वाहकांपुढे आव्हान असणार आहे, ते वेगळेच. या गाडया अचानक बंद पडल्यामुळे प्रवाशांनासुद्धा त्याचा त्रास होऊ शकतो.

**नियोजन चुकले**

अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली रक्कम त्या आर्थिक वर्षात उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारवर असते, पण त्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. योग्य नियोजन नसल्याने ही रक्कम वेळेवर उपलब्ध होऊ शकली नाही. आर्थिक वर्ष संपल्याने पुन्हा नवीन वर्षासाठी निधीची तरतूद करावी लागणार आहे. ही रक्कम वेळेवर मिळेल का, गाडया नक्की कधी येतील, याबाबतीत अनिश्चितता आहे. साहजिकच त्याचा फटका प्रवाशांना बसणार आहे.

सरकारने महिलांना अर्ध्या तिकीट दरात प्रवास देऊ केला आहे. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास देऊ केला आहे. यामुळे प्रवासी संख्येत मोठी वाढ झाली असून त्यांनाही याचा फटका बसण्याची शक्यता आहे. सरकारच्या नियोजनशून्य कारभारामुळेच हे घडत आहे. प्रवाशांच्या हितासाठी हे करावेच लागेल. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात नवीन गाडया घेण्यासाठी तरतूद करण्यात आलेली ९१२ कोटी रुपयांची रक्कम एसटी महामंडळाला मिळण्यासाठी व प्रवासी जनतेची होणारी भविष्यातील गैरसोय लक्षात घेऊन गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली रक्कम एसटीला वर्ग करण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती राज्य सरकारकडून निवडणूक आयोगाला करावी लागेल. व तशी मागणी केल्यास कदाचित ही रक्कम महामंडळाकडे वर्ग होऊ शकेल. अन्यथा त्याचा फटका राज्यातील गोरगरीब व ज्यांच्याकडे एसटीशिवाय प्रवासाचे कुठलेही साधन नाही, अशा प्रवाशांना बसेल. सध्या एसटीची प्रवासी संख्या वाढल्याने महामंडळ आर्थिक कुचंबणेतून बाहेर येत मार्गक्रमण करत आहे. त्यात आचारसंहितेच्या 'ब्रेक'मुळे अडथळा निर्माण झाला आहे.

## काँग्रेसला दिलासा

शिशिराची पानगळ चालू असतानाच, वसंताच्या आगमनाची चाहूल लागून चैत्र पालवीने मन मोहरून जावे, असे काहीसे काँग्रेसला सर्वोच्च न्यायालयाच्या दिलाशाने वाटल्यास नवल नाही. काँग्रेसमध्ये सुरू झालेली पानगळ गेला काही काळ सर्वच ऋतूंमध्ये होते आहे. नेते, कार्यकर्त्यांच्या या पळपळीने एखाद्या उद्ध्वस्त धर्मशाळेसारखी अवस्था या शतकोत्तर पक्षाची झाली आहे. दिवसागणिक नवनवे आघात होत असतानाच, पक्षाची सर्व बँक खाती गोठविली गेली. परिणामी, साध्या रेल्वे प्रवासालाही ऐन निवडणूक काळात पक्ष महाग झाल्याची व्यथा दस्तुरखुद्द राहुल गांधींनी व्यक्त केली. आता हेही कमी म्हणून की काय, प्राप्तिकर खात्याने साडेतीन हजार कोटींचा दंडवसुलीच्या नोटिशींचा भडीमार केला. हे सारे निवडणूक भरात येत असताना होत असल्याने या मागे कोणत्या महाशक्तीचा हात असेल, हे काही वेगळे सांगायला नको. कारवाईच्या या दट्ट्याने हवालदिल झालेल्या काँग्रेसला जर्मनी, अमेरिका व संयुक्त राष्ट्रे आदींच्या प्रतिक्रियांनी शाब्दिक दिलासा मिळाला असला तरी त्याने भागणार नव्हते. निवडणुकीच्या प्रक्रियेतून अशा पद्धतीने एका मोठ्या पक्षालाच बाद करण्याचे कारस्थान सामान्यांनाही आवडले नसणार. नेमक्या याच वेळी सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेले. निवडणुका होईपर्यंत ही दंडवसुली केली जाणार नाही, असे आश्वासन प्राप्तिकर खात्याने दिले आणि काँग्रेसच्या जिवात जीव आला. अलीकडे तर समस्त विरोधी पक्षांना सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचाच काय तो आधार उरला आहे. त्यात याची भर पडली. प्रमुख विरोधी पक्षांची अशी कोंडी करणे योग्य नाही, याबाबत दुमत नाही. तथापि, प्राप्तिकराच्या नियमांचे झालेले उल्लंघन, नोटिशींची दखल न घेणे याबाबत काँग्रेस पक्ष बेफिकीर राहिला. परिणामी राजकीय पक्षांना मिळणारी सवलत मिळू शकली नाही, ही बाबही दुर्लक्षिता येणार नाही. यंत्रणांनी बेमालूम चालू ठेवल्याने कारवायांसाठी न्याय्य निमित्त असले तरी ते संशयाच्या भोवऱ्यात सापडते. हे टाळायला हवे.

## लवकरच कचऱ्याची ई-वाहतूक सुविधा

# कचरा वाहतूक व संकलनासाठी अखेर निविदा प्रसिद्ध

■ नवी मुंबई : प्रतिनिधी,

स्वच्छ शहरांत नवी मुंबई चा समावेश होत असून महापालिकेने कचरा वर्गीकरणाची व्याप्ती वाढवण्याची तयारी सुरू केली आहे. मागील वर्षभरापासून सातत्याने मुदतवाढ देण्यात येणाऱ्या कचरा वाहतूक व संकलनाची निविदा पालिकेने प्रसिद्ध केली असून पालिकेच्या इतिहासात प्रथमच कचऱ्याची ई-वाहतूक सुविधाही राबवली जाणार आहे. १३ मेपर्यंत निविदा स्वीकारण्याची मुदत देण्यात आली. आतापर्यंत कचरा वाहतूक व संकलनासाठी वारंवार जुन्याच ठेकेदाराला मुदतवाढ दिली जात होती. त्यातच पालिकेला अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडून प्रकल्प अहवाल प्राप्त होण्यासाठी बराच कालावधी लागला होता. त्यामुळे आता पालिकेने या कामाबाबत निविदा काढली असून मागील काम हे २४०० रुपये टनाप्रमाणे देण्यात आले होते. त्यामुळे यावेळची निविदा किती कोटीपर्यंत जाणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे. पालिकेने कचरा वाहतूक व संकलनासाठी मार्च २०१५ ते मार्च २०२२ पर्यंत शहरातील कचरा वाहतूक व संकलनाच्या ठेकेदाराला काम दिले होते.




कचरा वाहतूक व संकलनासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली असून ई वाहनांचाही वापर केला जाणार आहे. गावठाणांतील कचरा संकलनाबाबतही नव्या निविदेत प्राधान्य देण्यात आले आहे.
**-डॉ. कैलास शिंदे, आयुक्त, नमुंमपा**

परंतु, संबंधित ठेकेदाराची मुदत संपल्याने पालिकेने याच ठेकेदाराला पुन्हा कामासाठी मुदतवाढ दिली ती २०२४ मार्चपर्यंत वाढवली. त्यामुळे याबाबत उलटसुलट चर्चा केल्या जात होत्या.

नव्याने निविदा प्रक्रिया पूर्ण करेपर्यंत मे. ए. जी. एनव्हायरो ठेकेदाराला मुदतवाढ दिली आहे. कचरा वाहतूक व संकलनासाठीचा विस्तृत असा प्रकल्प अहवाल पालिकेला प्राप्त झाल्याने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्यावतीने बनवण्यात आलेल्या अहवालाच्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया राबवली गेली आहे. यंदा कचरा वर्गीकरणाची व्याप्ती नव्या निविदा प्रक्रियेत वाढवली जाणार आहे. विविध पध्दतीचा कचरा वेगळा करण्याचा पालिकेचा मानस आहे. ओला व सुका कचऱ्याच्या वर्गीकरणाप्रमाणेच घरगुती घातक कचरा वर्गीकरण तसेच प्लास्टिक, लाकूड, काच, धातू अशा कचऱ्याचे वर्गीकरण करुन कचरा संकलन केले जाणार आहे. तसेच एकीकडे सर्वत्र इलेक्ट्रीक गाड्यांचा वापर सुरु झाला असताना कचरा वाहतुकीसाठीही छोट्या इलेक्ट्रीक गाड्यांचा वापर करण्याबाबतही विचार केला जाणार असल्याची माहिती पालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. आगामी कचरा वाहतूक व संकलन निविदा कोट्यवधींच्या घरात जाणार असून शहराला देशात स्वच्छतेबाबत मिळालेला नावलौकिक टिकवण्यासाठी व सातत्याने वाढवण्यासाठी पालिका योग्य ती खबरदारी घेणार असल्याचे चित्र आहे.

# शिक्षणाचा हक्काच्या मोफत शालेय प्रवेशासाठी ठाणे जिल्ह्यातील २६१५ शाळांची नोंद



■ ठाणे : प्रतिनिधी,

शिक्षणाचा हक्क (आरटीई) या कायद्याखाली मोफत शालेय प्रवेश देणाऱ्या शाळांची नोंद (रजिस्टेशन) जिल्ह्याभरातून करण्यात आली आहे. एक वेळ मुदत वाढ देण्यात आली आहे. या मुदती अखेर आजपर्यंत दोन हजार ६१५ शाळांची नोंद सर्व शिक्षण अभियानाव्दारे करण्यात आली. उर्वरीत आठ शाळांनी या मुदती अखेरही त्यांची नोंद केली नसल्याची बाब घडकीस आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वषार्साठी आरटीईच्या २५ टक्के मोफत शालेय प्रवेशासाठी जिल्ह्याभ्रातील शाळांकडून रजिस्टेशन करून घेतले जात आहे. शासनाच्या नियमास अनुसरून आजपर्यंत दोन हजार ६१५ शाळांचे रजिस्टेशन करण्यात आले आहे. मात्र या मुदतीत अजून आठ शाळांचे रजिस्टेशन बाकी आहे. त्यांना मुदत वाढ मिळण्याची शक्यता नसल्याचे बोलले जात आहे. मात्र गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा शाळांची ही सख्या तिप्पट झाली आहे. गेल्या वर्षी अवघ्या ६२९ शाळांचा समावेश होता. त्यातुलनेत यंदा या शाळांची संख्या वाढली आहे. मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या दुब्रल घटकातील मुलांना या आरटीईच्या कायद्याखाली जवळच शाळेत केजी ते पहिलीच्या वर्गात मोफत प्रवेश दिला जात आहे. यंदा राज्य शासनाने त्यात सुदाधरणा केलेली आहे. त्यास अनुसरून यंदा या शाळांच्या संख्येत वाढ झालेली आहे. त्यात किती र्ना मोगत प्रवेश मिळणार ही संख्या मात्र जिल्ह्यात अजूनही उघडा झालेली नाही. मात्र संबंधित शाळेच्या एकूण प्रवेशापैकी तब्बल २५ टक्के शालेय प्रवेश या आरटीई कायद्याखाली मोफत देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. गेल्या वर्षी ठाणे जिल्ह्यातील ६२९ शाळांनी १२ हजार २६७ जागा उपलब्ध करून दिल्या होत्या. त्यासाठी तब्बल ३० हजार ५५७ बालकांनी आनलाइन अर्ज दाखल केले होते.

# Heat wave in parts of Maharashtra: IMD issues yellow alert for April 5 and 6, check details



■ **Mumbai**

The Indian Meteorological Department (IMD) has issued a yellow alert for April 5 and 6 alerting citizens regarding Heat wave in parts of Maharashtra.

According to the IMD, during last 24 hours, the weather remained dry in the districts of Vidarbha in Maharashtra. The maximum temperature was in the range of 39 degrees Celsius to 42 degrees Celsius that remained above from the normal.

"The minimum temperature was in the range of 22 degrees Celsius to 26 degrees Celsius that remained in the range of normal," the weather department said in a statement.

Meanwhile, Wardha reported highest maximum temperature, followed by Brahmpuri, Akola, etc, the weather department said on Thursday.

Several districts in Maharashtra have been reeling under scorching heat. Some districts in Madhya Maharashtra and Vidarbha are witnessing extreme temperatures. Solapur witnessed a maximum temperature of 42.2 degrees Celsius on April 3.

"There is no large change in Maximum and Minimum Temperature for next three days over the region, with slight rising tendency," the IMD said.

While issuing a yellow alert for some districts in Maharashtra including Yavatmal, Chandrapur, Wardha and Akola, the IMD said, the heat wave condition is likely to occur in the isolated pockets of Yavatmal and Chandrapur. Warm night condition are likely to occur in the isolated pockets of Wardha on April 5."

For April 6 alert, the IMD said, the heat wave condition is likely to occur in the isolated pockets of Yavatmal and Akola. Warm night condition was likely in isolated pockets of Wardha."

**Do's and Dont's during Heat wave Condition**

- Avoid heat exposure.
- Wear lightweight, light-coloured, loose, cotton clothes.
- Cover your head: Use a cloth, hat or umbrella.
- Avoid dehydration. Drink sufficient water, even if not thirsty.
- Use ORS, Homemade drinks like Lassi, Torani (Rice water), Lemon Water, Buttermilk, etc. to keep yourself Hydrated.
- Avoid working outside between 12 Noon and 3 PM
- Keep animals in shade and give them plenty of water to drink.
- Wear protective clothing and seek indoor shelter.

# 'My goal is to play for India': Mayank Yadav



■ **Mumbai**

M Siddharth lived out a dream at the M Chinnaswamy Stadium on Tuesday night. In the process, he also came good on his word to Lucknow Super Giants (LSG) head coach Justin Langer. Yet, he was not even the star of the show during his team's convincing 28-run defeat of Royal Challengers Bengaluru (RCB).

Entrusted with the first over of the chase as RCB set out in quest of 182—Siddharth bowled three overs in the powerplay—the left-arm spinner accounted for Virat Kohli with his 14th delivery, caught off the leading edge at point. "I had always dreamt of taking his wicket," the 25-year-old gushed. "You can ask anyone… it's the biggest wicket you can take. I'm really happy." Not a bad first wicket to have in the IPL.

Kohli was but one of several big tickets in the RCB batting unit. Someone else had to step up and account for the rest. That someone else answered to the name of Mayank Yadav, the 21-year-old tearaway from Delhi who is making heads turn and people sit up and take notice.

On debut against Punjab Kings, Mayank had picked up three for 23, and the Player of the Match award. He went one better on Tuesday, cleaning up Glenn Maxwell, Cameron Green and Rajat Patidar, finishing with three for 14 from four overs that included 16 dot balls. He repeatedly flirted with the 150 kmph mark and at times breezed past 155, his skiddy pace making him impossible to line up. "I have played against him in local matches and we planned to use his pace against him, but we made some mistakes," conceded Mahipal Lomror, who came on as RCB's Impact Player and smashed 33 off 13, the highest score in his team's tally of 153 all out. "Mayank is bowling really well and I am happy for him."

The man in question is determined not to get ahead of himself. Having missed last season through injury, he is well aware of the importance of making a good thing count. "I feel very good, winning two Player of the Match awards, but happier because we won both matches," Mayank said at the post-match presentation. "My aim is to play for India as much as possible. I feel this is just the start and my mail goal is what I am focused on."

Mayank has a plethora of members in the dugout to turn to for support and encouragement. One of them is KL Rahul, his captain who has already led the country in all formats. "So happy to see Mayank bowl the way he has in the last couple of games," Rahul observed. "He has quietly waited for two seasons because of injury, but he has been working very hard. It's great seeing him bowl that fast from behind the stumps."

156.7kph : LSG pacer Mayank Yadav's bowling speed against RCB; the fastest in IPL-17

# निवडणुकीनंतरच घोडबंदरवासीयांना पाणीपुरवठा

## आचारसंहितेमुळे सरकारची बैठक न झाल्याने निर्णय रखडला

■ गणेश पारकर

**ठाणे** : घोडबंदरच्या नागरिकांना वाढीव पाणीपुरवठा व्हावा याकरता ठाणे महापालिकेने स्टेम प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार केला आहे.यात वाढीव ५ दशलक्ष लिटर पाणी मिळावे अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत राज्य शासनाच्या बैठकीत वाढीव पाणी पुरवठाबाबत निर्णय होणार होता. मात्र लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू झाल्याने ही बैठक किमान जून पर्यंत होऊ शकणार नाही. परिणामी यंदाच्या उन्हाळ्यात तरी घोडबंदर पट्ट्याला वाढीव पाणीपुरवठा होऊ शकणार नाही.अशी माहिती महापालिकेतील विश्वसनीय सुत्रांनी दिली.

ठाणे महापालिका क्षेत्रात चार स्त्रोतांमार्फत दररोज ५८५ दशलक्ष लिटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यात महापालिकेच्या स्वतःच्या योजनेतून २५० दशलक्ष लिटर, स्टेम प्राधिकरणाकडून ११५ दशलक्ष लिटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्ष लिटर आणि मुंबई महापालिकेकडून ८५ दशलक्ष लिटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. परंतु असे असले तरी आजही ठाण्यातील अनेक भागांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यात घोडबंदर भागाला तर याची झळ अधिक बसत आहे. या भागाला कमी पाणी पुरवठा होत असल्याने त्याचा फायदा टँकर माफिया घेत आहेत.



त्यामुळे अनेक सोसायटींना टँकरचेच बिल महिनाकाठी ४ ते ५ लाख जात आहे. त्यामुळेच तत्कालीन महापालिका आयुक्तांनी घेतलेल्या पाण्या संदर्भातील पहिल्या बैठकीत घोडबंदरचा पाणी प्रश्न चांगलाच पेटल्याचे दिसून आला होता. लोकप्रतिनिधीनी या भागाला १०० एमएलडी पाणी दिले तरी कमी पडणार असल्याची भूमिका मांडली होती. त्यात काहींनी याच मुद्यावरुन महापालिका तत्कालीन आयुक्तांची भेट घेत वाढीव पाण्याची मागणी केली होती.

घोडबंदर परिसरातील लोकसंख्या सद्यस्थितीला ५ ते ७ लाखांच्यावर गेली आहे. या भागाला सध्या प्रतिदिन ११० दशलक्ष लिटर पाणी पुरवठा केला जात आहे. परंतु तो देखील अपुरा पडत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता महापालिकेने या भागाला वाढीव ५ दशलक्ष लिटर मिळावे यासाठी स्टेम प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार केला आहे. यापूर्वी देखील महापालिकेने वाढीव पाण्यासाठी पत्रव्यवहार केला होता. परंतू त्याला फारसा यश आलेले दिसून आले नाही.

घोडबंदरच्या नागरिकांना वाढीव पाणीपुरवठा व्हावा याकरता ठाणे महापालिकेने काही दिवसापूर्वी स्टेम प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार केला होता .यात वाढीव ५ दशलक्ष लिटर पाणी मिळावे अशी मागणी करण्यात आली आहे .पण या पत्राच्या बाबत राज्य शासनाच्या पाटबंधारे विभागाकडून एक बैठक आयोजित केली जाणार होती .

या बैठकीत घोडबंदरला वाढीव ५ दशलक्ष लिटर पाणी पुरवठा करण्याबाबत निर्णय घेण्यात येण्याची शक्यता होती . मात्र आता लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू झाली आहे . परिणामी ही बैठक आता होऊ शकणार नाही .परिणामी ही बैठक लोकसभा निवडणूका पार पडल्यानंतरच होईल . अशी माहिती महापालिकेतील विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे .

# मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपींना अटक

■ **बोईसर** : दोन मोटार सायकल चोरी करणाऱ्या चार चोरट्यांना पकडण्यात बोईसर पोलीसांसह पालघर विभागाच्या पोलीस अधिकाऱ्यांना यश आले आहे. पंकज सुजीत शर्मा,नितेश धर्मेंद्र तिवारी,देवेंद्र बन्सराज चौहाण,हर्ष प्रमोद सिंग असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. सद्या त्यांचे वास्तव्य बोईसर असून चौघेही उत्तर प्रदेशातील आहेत.

रोहित कमलेश जैन यांनी बोईसर पोलीस ठाण्यात २९ मार्च रोजी त्यांच्या मालकीची बजाज कंपनीची ॲव्हेंजर मोटार सायकल ही विराज कंपनीच्या बाहेरील पार्कींग मधून अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याचे तक्रारीत म्हटले होते. त्या अनुषंगाने अज्ञात आरोपी यांचा स्थानिक गुन्हे शाखा, पालघरचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे देखील समांतर शोध घेत होते. पालघर पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक पंकज शिरसाट,उपविभागीय पोलीस अधिकारी, विकास नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली चोरीस गेलेली मोटार सायकलचा बोईसर गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे गुन्ह्यातील मोटार सायकलचा व अज्ञात आरोपीचा शोध घेत ॲव्हेंजर मोटार सायकलसह सालवड येथील शिवाजी नगर मधुन चोरी केलेल्या ॲक्टिवा गाडीची चोरी केल्याचे आढळून आले. आरोपींकडून नमूद दोन्ही गुन्ह्यातील मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला असून चौघांनाही अटक करण्यात आली आहे.

# आक्षेपार्ह पोस्ट प्रकरणी एकास अटक

■ **शहापूर** : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बौद्ध धर्मीयांबद्धल इन्स्टाग्रामवरून आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात एकाला अटक करण्यात आली आहे. त्याला कल्याण सत्र न्यायालयाने ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. शहापूर तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ता अनिल कांबळे यांनी पोलिसांत फिर्याद नोंदवली होती.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती सोहळा येत्या काही दिवसांवर आला आहे. त्यातच माथेफिरू युवकाच्या सोशल मिडियावरील आक्षेपार्ह पोस्टमुळे पोलीस उपविभागीय अधिकारी शिंदे व पोलीस निरीक्षक जगताप यांनी तत्काळ खबरदारी घेऊन परिस्थिती नियंत्रणात ठेवत युवकाला अटक केली.

# टोकावडेत दुसऱ्यांदा बालविवाह उधळला

■ **शहापूर** : टोकावडे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मिल्हे गावातील मुलीचा बालविवाह उधळल्याच्या घटनेला अवघे दोनच महिने लोटले असतांना टोकावडे पोलीसांच्या कार्यक्षेत्रातच मढ गावात प्रशासनाच्या सतर्कतेमुळे दुसऱ्यांदा बालविवाह उधळण्यात आला.



मुरबाड मधील मढ येथे बालविवाह होणार असल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, ठाणे कार्यालयाअंतर्गत जिल्हा बालसंरक्षण कक्षाला मिळाली होती. त्यांनी शहापूर व मुरबाडच्या संयुक्त संरक्षण अधिकाऱ्यांना याबाबत कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेन्द्र गायकवाड, टोकावडेचे पोलीस निरीक्षक दिनकर चकोर, बालविकास प्रकल्प अधिकारी कल्पना देशमुख, शहापूर व मुरबाडचे संरक्षण अधिकारी युवराज वडेकर, पोलीस हवालदार नितीन घाग, सहाय्यक संरक्षण अधिकारी अंकुश शिंदे, स्थानिक मुख्यसेविका आणि अंगणवाडी सेविका यांच्या पथका मार्फत बालविवाह रोखण्याची दक्षता घेतली आहे. तसेच गावात पालक, ग्रामस्थ आणि अल्पवयीन मुलगी यांचे समुपदेशन करण्यात आले आहे. बालिकेची पालक असलेल्या आजीकडून बालिका १८ वर्षे पूर्ण होत नाही तोपर्यंत तिचे लग्न करणार नाही,असे बंधपत्र लिहून घेण्यात आले.ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बालविवाहाच्या जागृतीबाबत अभाव असल्याने बालविवाहाच्या घटना घडत आहेत. बालविवाह प्रतिबंधक कायद्याचा प्रसारही कमी पडत आहे. परंतू प्रशासन सतर्कता बाळगून असल्याने अशा घटना रोखल्या जात आहे.

# पालिकेकडून ७०३ कोटींच्या मालमत्ताकराची वसुली

## महापालिकेने ७५० कोटींच्या वसुलीचे ठेवले होते उद्दिष्ट

■ **ठाणे** : ठाणे महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने २०२३,२४ मध्ये एकूण ७५० कोटी रुपये वसूल करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. मात्र यात ७०३ कोटी ९३ लाखांची वसूली झाली आहे.

ठाणे महापालिकेच्या एकुण नऊ प्रभाग समित्यांमध्ये माजिवडा-मानपाडा प्रभाग समितीमध्ये सर्वाधिक २२० कोटी ४१ लाख रुपयांची वसूली झाली आहे. तर कळव्यात सर्वात कमी २४ कोटी ७८ लाख रुपयांचा मालमत्ता कर जमा झाला आहे.जकात आणि एलबीटीसारखे करवसुलीचे स्त्रोत बंद झाल्यानंतर ठाणे महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत मालमत्ता कर आहे. मालमत्ता कराची थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिका प्रशासन मालमत्ता जप्तीसह विविध डावपेच अवलंबते, मात्र असे करूनही उत्पन्नात घट होत आहे. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवसापर्यंत ३१ मार्चपर्यंत मालमत्ता कराचे ७०३ कोटी ९३ लाख रुपये ठाणे महापालिकेच्या तिजोरीत जमा झाले आहेत. निर्धारित उद्दिष्ट सोडा, मागील वर्षी इतकी करवसूलीही होऊ शकली नाही. २०२२-२३ या वर्षासाठी ७१३ कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, तेव्हा ७११ कोटी रुपये वसूल करण्यात महापालिका मालमत्ता कर विभागाला यश आले होते. गेल्या वर्षी अंदाजे ९९.८० टक्के कर जमा झाला होता. मात्र यंदा महापालिकेच्या कर विभागाला ९४ टक्के कर वसूल करण्यात यश आले आहे. जे गेल्या वर्षीच्या तुलनेत ६ टक्के कमी आहे.




| प्रभाग समितीनिहाय | वसूली |
|---|---|
| माजिवडा, मानपाडा | २२० कोटी ४१ लाख |
| वर्तकनगर | १०२ कोटी ८५ लाख |
| मुख्य कार्यालय | ७६ कोटी ७४ लाख |
| उथळसर | ४५ कोटी ७३ लाख |
| नौपाडा, कोपरी | ९० कोटी ८ लाख |
| कळवा | २४ कोटी ७८ लाख |
| मुंब्रा | ४० कोटी ५९ लाख |
| दिवा | ४७ कोटी ८९ लाख |
| वागळे इस्टेट | २५ कोटी ८५ लाख |
| लोकमान्य सावरकर | २९ कोटी १लाख |
| एकूण | ७०३ कोटी ९३ लाख |

# गुंतवणुकीच्या आमिषाने २७ लाखांचा गंडा

■ **ठाणे** : इंस्टाग्रामवर अज्ञात व्यक्तीने शेअर्स मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास नफ्याचे आमिष दाखवून व्हाट्सअपवर लिंक पाठवली. लिंकच्या माध्यमातून डिमॅट खाते उघडून २७ लाखांची रक्कम ट्रान्स्फर करण्यास सांगितले आणि गंडा घातला.ही घटना १० जानेवारी ते २१ फेब्रुवारी २०२४ दरम्यान घडली असून तक्रारदार महिलेने वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात दोन अज्ञाताच्या विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल केला. तक्रारदार गृहिणी असून वागळे इस्टेट, ठाणे येथे राहतात. त्यांना इन्स्टाग्रामवर एक मेसेज आला. शेअर्स मार्केटमध्ये गुंतवणूक करुन लाखोंचा फायदा मिळवून देण्याचे आमिष त्यांना देण्यात आले.त्यासाठी लिंकद्वारे तक्रारदारांला व्हाट्सअप ग्रुपमध्ये सामावून घेत २७ लाखांची रक्कम ऑनलाईन ट्रान्स्फर करण्यास सांगण्यात आले.

# भिवंडीत दोन गटांत झालेल्या हाणामारीत एकाचा मृत्यू

■ **भिवंडी**: भिवंडी शहरातील कामगार वस्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शांतीनगर भागातील केजीएन चौकाच्या बाजूला चाळीत पूर्व वैमनस्यातून झालेल्या दोन गटातील हाणामारीत एकाचा मृत्यू तर सहा जण जखमी झाले आहेत.या प्रकरणी पाच जणांना ताब्यात घेतल्याची माहिती शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली. जुबेर शोएब शेख (४८) असे मृताचे नाव असून त्याच्यावर एका गटाने केलेल्या चाकूहल्लाने त्याचा मृत्यू झाला आहे. ही घटना मंगळवारी सायंकाळी घडली आहे. तर या घटनेत दोन्ही गटाचे मिळून सहाजण जखमी झाले आहेत. या घटनेने शांतीनगर मधील केजीएन परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.आज दुसऱ्या दिवशी देखील ते कायम होते. त्यामुळे पोलिसांनी विशेष बंदोबस्त ठेवला होता.या भागातील मुलाचे एकतर्फी प्रेमप्रकरण आणि क्रिकेटच्या खेळावरून गेली वर्षभर हे वैमनस्य सुरु होते. हा वाद मंगळवारी खेळाच्या मैदानावर सुरु होऊन ते चाळीपर्यंत आला. दोन चाळीच्या बोळामध्ये दोन गटात ही हाणामारी झाली. त्यावेळी झालेल्या चाकू हल्ल्यात जखमी होऊन जागीच त्याचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले आहेत.



# वाहतूक विभागाकडून ८२ लाखांचा दंड वसूल

## विना हेल्मेट, मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई

■ **अंबरनाथ**: कर्मचाऱ्यांची कमतरता असतानाही अंबरनाथ वाहतूक पोलिसांनी वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर धडक कारवाई करत गेल्या ३ महिन्यांत ८२ लाख ८६ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.वाहतूक पोलिस विभागाच्यावतीने राबविण्यात आलेल्या या मोहिमेचे त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कौतुक होत आहे.

अंबरनाथ शहराची लोकसंख्या साडेतीन लाखांवर गेली आहे.त्यामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांचे प्रमाणही वाढले असून वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक सुदेश आजगांवकर व त्यांच्या पथकाने विना हेल्मेट, सीट बेल्ट, ड्रंक अँड ड्राईव्ह, काळी काच आदी नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक दंडात्मक कारवाई केली आहे. साईड भाडे भरणाऱ्या वाहनांवरही कारवाई करण्यात आली आहे.गेल्या तीन महिन्यांत वाहतूक विभागाने सुमारे ८६५० गुन्ह्यांची नोंद करून ८२ लाख ८६ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

अंबरनाथ वाहतूक विभागाकडे तीन शहरांची जबाबदारी आहे.यामध्ये उल्हासनगर कॅम्प ५, अंबरनाथ आणि बदलापूरचा समावेश आहे. एवढया मोठया परिसरात त्यांच्याकडे केवळ २० ते २२ कर्मचारी आहेत. मात्र त्यानंतरही नियम मोडणाऱ्यावर वाहतूक पोलिसांकडे धडक कारवाई सुरू आहे.यापुढे रस्त्याच्या कडेला उभ्या करून ठेवण्यात येत असलेल्या बसेस व इतर मोठया वाहनांवर कारवाई करून ती जप्त करण्यात येणार असल्याची माहिती वाहतूक पोलीस निरीक्षक सुदेश आजगांवकर यांनी सांगितले. शहरातील इतर वाहतूक नियोजनाचाही गांभीर्याने विचार केला जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



# पूर्व वैमनस्यातून तीन जणांवर हल्ला

■ **उल्हासनगर**: उल्हासनगरच्या वाल्मिकीनगर परिसरात तीन जणांवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आता या हल्ल्या प्रकरणी उल्हासनगर पोलिसांनी तीनजणांना अटक केली आहे. हा हल्ला पूर्ववैमन्यासातून झाल्याची चर्चा शहरात रंगली आहे. उल्हासनगर कॅम्प एकमध्ये वाल्मिकी नगर आहे. याच परिसरात दबदबा असलेला छिद्दी बैद हा कुटुंबासह राहतो. शनिवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास बैद यांच्या घराजवळ अमन तेजी, विशाल तेजी, करण तेजी, अर्जुन तेजी, अक्षय धामणे व दोन अनोळखी व्यक्ती आले. ते छिद्दी याचा मुलगा साहिल याला शिवीगाळ करत होते. त्याना छिद्दी, छिद्दीचा मुलगा साहिल आणि भाऊ विनोद बैद यांनी जाब विचारला. याचा राग आल्याने अमन तेजी, विशाल तेजी, करण तेजी, अर्जुन तेजी, अक्षय धामणे आदींनी तलवार आणि चॉपरच्या सहाय्याने बैद कुटुंबांवर हल्ला केला. या हल्ल्यात छिद्दी हा गंभीर जखमी झाल्याने त्याला तत्काळ मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याची प्रकृती ही चिंताजनक आहे. याप्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाण्यात साहिल बैद याने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. उल्हासनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे, चंद्रहार गोडसे यांच्या पोलीस पथकाने तत्काळ अमन तेजी, विशाल तेजी, अक्षय धामणे त्यांना तात्काळ अटक करण्यात आली आहे. तर करण तेजी, अर्जुन तेजी व अन्य दोन अनोळखी हे फरार आहेत. विशेष म्हणजे अमन तेजी आणि विशाल तेजी यांच्यावर उल्हासनगर पोलीस ठाण्यात यापूर्वीही हाणामारीसह जुगार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत विविध गुन्हे दाखल आहेत.

# स्वच्छतेसाठी सहकार्य न करणाऱ्यांवर होणार कारवाई

## रेंटल इमारतीत स्वच्छतेचा अभाव, महिलांनी घेतला पुढाकार

■ **ठाणे** : महापालिकेच्या माध्यमातून रेंटलच्या इमारतीत स्वच्छतेचा अभाव दिसून येत होता.या संदर्भात उचलेल्या पावलानंतर येथील महिलांनी एकत्र येऊन कचरा उचलण्यासाठी कर्मचाऱ्याची नियुक्ती केली आहे. त्यानुसार घरामागे ५० रुपये काढले जात आहेत. मात्र काही रहिवासी प्रतिसादच देत नसल्यामुळे 'त्या' रहिवाशांच्या '' विरोधात महापालिकेने कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

रस्ता रुंदीकरणात बाधित, धोकादायक इमारती व इतर कारणांसाठी बाधित झालेल्या रहिवाशांना महापालिकेच्या माध्यमातून रेंटलच्या इमारतीत २ रुपये नाममात्र भाडेतत्वावर वर्तक नगर येथे दोस्तीची रेंटल होमची घरे आहेत. याठिकाणी ४ इमारती असून त्याठिकाणी १४४८ फ्लॅट आहेत. मागील कित्येक वर्षापासून येथे रहिवासी वास्तव्यास आहेत. परंतू याठिकाणी कधी लिफ्ट दुरुस्त नसणे, पाण्याची वानवा , याशिवाय स्वच्छतेचा अभाव दिसून आला . येथील सुविधा महापालिकेकडून वारंवार पुरविल्या जात होत्या. मात्र येथील रहिवाशांकडून येथे अस्वच्छता केली जात होती.अशा घटनांवर आळा बसावा म्हणून व्यवस्थापकाची देखील नेमणूक करण्यात आली होती. परंतू ते कंत्राट संपल्यानंतर व्यवस्थापकही आता नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे पुन्हा या ठिकाणी व्यवस्थापक नेमला जावा अशी मागणी करण्यात आली आहे. परंतू या उलट येथील रहिवाशांचीच एक कमिटी तयार करुन त्यांच्याकडून इमारतींची देखभाल, दुरुस्तीसह स्वच्छतेच्या कामाबाबत पुढाकार घेतला जावा या उद्देशाने ठाणे महापालिकेच्या माध्यमातून पावले उचलण्यात आली . याठिकाणी पाहणी केल्यानंतर येथील महिलांनी एकत्र येऊन स्वच्छतेच्याबाबत पुढाकार घ्यावा अशी मागणी लावून धरण्यात आली होती.त्यासाठी महिलांचे प्रबोधनही करण्यात आले होते.त्याचा चांगला परिणाम म्हणजे महिलांनी एकत्र येऊन कचरा उचलण्यासाठी नियमित पैसे काढण्याचे निश्चित केले आहे.

◆४० ते ४५ टक्के महिला पैसे जमा करत आहेत व कचरा उलचण्यासाठी देत आहेत. परंतू उर्वरीत रहिवासी त्याला सहकार्य करत नसल्याने महापालिकेने जे अशा कामांत सहकार्य करत नसतील त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल असे संकेत दिले . त्यानुसार महापालिकेने पावले उचलण्यास सुरवात केली . जे रहिवासी याचा भार उचलत नसतील अशांचा सर्व्हे देखील पुढील काही दिवसांत सुरु करणार असून पुढील दिशा निश्चित केली जाणार आहे .




# शहापुरातील ग्रामपंचायतींवर श्रमजीवींचा हंडा मोर्चा

## तीन दिवसांत १२ ग्रा.पं.वर हंडा मोर्चा; जलजीवनची बिले रोखण्याची मागणी



■ **खर्डी**: शहापूर तालुक्यात सुरू असलेल्या पाणीटंचाई वर मात करण्यासाठी आणि या तालुक्यातील आणलेल्या जलजीवन योजनेच्या ' हर घर जल'योजनेची चौकशी व्हावी या मागणीसाठीशहापुर तालुक्यातील १२ ग्राप वर गेल्या तीन दिवसात शहापुर श्रमजीवी संघटनेमार्फत महिलांनी हंडा मोर्चा काढून प्रशासनाची तारांबळ उडवली आहे. अधिकाऱ्यांची उत्तरे देतांना दमछाक झाल्याचे निदर्शनास येत आहे.

' सरकारकडे गाऱ्हाणे मांडत पाण्यासाठी करू नका झोल पाईप टाका तीन फुट खोल', आधी आम्हाला काम दाखवा मगच पैशाला हात लावा! टप्पे झाले एक दोन तीन चार ठेकेदार झाले मालामाल! अशा घोषणा यावेळी हंडा मोर्चातील महिलांनी दिल्या.तालुक्यातील २०० च्या आसपास जलजीवन योजनेचे काम सुरू असून फक्त ६ योजनेचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित योजनेचे काम पूर्ण करण्याचा कालावधी संपूनही काम पूर्ण न झाल्याने या कामांची चौकशी करून ठेकेदारांना बिल देण्यात येऊ नये व प्रत्येक घरात नळाद्वारे पाणी देण्यात यावे यासाठी श्रमजीवी संघटनेने जलजीवन योजनेत सुरू असलेल्या घोळाकडे लक्ष वेधण्यासाठी तालुक्यात मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रकाश खोडका यांनी सांगितले. या योजनेतील काही योजनांची कामे अर्धवट असून सुद्धा बिले काढण्यात आली असल्याचा आरोपही संघटनेच्यावतीने करण्यात येत असल्याने संबंधित योजनेच्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

◆यावेळी श्रमजीवी संघटनेचे सरचिटणीस बाळाराम भोईर,उपप्रमुख मालू हुमणे, तालुका सचिव प्रकाश खोडका, रुपेश आहिरे, कमलाकर शि, दर्शना आगीवले,पप्पु वाघ,बुधीबाई आवाळी ,रंजना वाघ व सपना वारघडे, राम वाघ, रामदास वाघ व योगेश शेणे यांच्यासहीत शेकडो महिला उपस्थित होत्या .दरम्यान यासर्व योजनेची माहिती घेऊन १० तारखेनंतर याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार असल्याचे पाणीपुरवठा अधिकाऱ्यांने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले आहे .




# अवैधरीत्या देशी कट्टा बाळगणाऱ्यास पोलिसांकडून अटक

■ **नालासोपारा** : अवैधरित्या देशी बनावटीचे पिस्तूल जवळ बाळगणाऱ्या आरोपीस अटक करुन त्याच्याकडून ०२ देशी बनावटीचे पिस्तूल व ०२ जीवंत काडतुसे जप्त करण्यास पेल्हार पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास यश आले आहे.सार्वत्रिक लोकसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्यावर कारवाई बाबतचे आदेश दिले होते.

त्याअनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेप्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार गस्त करत असताना रात्री गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सोपान पाटील यांना एकजण मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०८ वरील वसई फाटा येथील ब्रिजच्या खाली विना परवाना देशी बनावटीचे पिस्तूल घेऊन येणार असल्याबाबत माहिती प्राप्त झाली होती.

या बातमीच्या अनुषंगाने सपोनि सोपान पाटील, यांनी पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी यांना माहिती दिली असता त्यांनी या बातमीची सत्यता पडताळून कायदेशिर कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. पेल्हार पोलीस ठाण्याचे अधिकारी अंमलदार यांनी सापळा रचून बेकायदेशीर अवैध पिस्तूल बाळगणारा अभिषेक अनिल यादव १९ याला ताब्यात घेऊन त्याची दोन पंचासमक्ष झडती घेतली असता त्याच्या ताब्यात ४०,००० किंमतीचे एक देशी बनावटीचे पिस्तूल, ०१ जीवंत राऊंन्ड, ०१ फायटर, एक ५०० रुपये दराची भारतीय चलनातील नोट, एक चिन्ड्रन बँक ऑफ इंडियाची ५०० रुपये दराची नोट, एक ५,००० रुपये किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल फोन असा एकूण ४५,९०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

# आगीत घर जळालेल्या कुटुंबांना मदतीचा हात



■ **वाडा** : दोन दिवसापूर्वी गारगांव येथे आग लागली होती. त्या आगीत नऊ घरांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. आज पालघर जिल्हा परिषदेच्या गट नेत्या तथा महिला व बालकल्याण सभापती,सदस्य जिल्हा नियोजन समिती पालघर रोहिणी शेलार यांनी भेट देऊन धान्याचे कीट मदत म्हणून वाटप करण्यात आले. व त्यांना सर्वोतोपरी लवकरात लवकर शासकीय मदत मिळवून देवू अशी ग्वाही रोहिणी शेलार यांनी दिली.त्या प्रसंगी गारगांव ग्रामपंचायत सरपंच,सदस्य ग्रामसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते.